https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे | अंक -१४५ गुरुवार,दि.३० जानेवारी २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-145 | Thursday, Dt.30 January 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

## अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा



बीड :- अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा पुढीलप्रमाणे आहे.गुरुवार दि. ३० जानेवारी २०२५ रोजी लोहगाव पुणे येथून बीडकडे प्रयाण. सकाळी ६.०० वाजता बीड येथे शासकीय विश्रामगृह बीड येथे आगमन.

# अजित 'दादा' बीड जिल्ह्याला जातीवादातून मुक्त करण्याचा करा 'वादा' !

## मुंडेंच्या पाठीशी ठाम राहून दादांनी खरा आदर्श उभा केला !!



### जातीयवाद मिटवणाऱ्यांना प्रोत्साहन पर बक्षिसे जाहीर करा

दादा आज डीपीडीसी मधून एका विशेष निधीची तरतूद करा.बीड जिल्ह्यात जो जातिवाद पसरत आहे तो मिटवण्यासाठी जे कोणी पुढे येतील त्यांच्यासाठी प्रोत्साहन पर बक्षिसे जाहीर करा.

बीड / वैभव स्वामी

आज बीड जिल्हा वेगळ्या राजकीय वळणातून जात आहे. ज्या बीड जिल्ह्याने राजकीय नेतृत्वातून महाराष्ट्रामध्ये देशामध्ये आपले वर्चस्व निर्माण केले त्याच जिल्ह्यातील नेतृत्व आज स्थानिक अंतर्गत राजकीय वाद आणि द्वेषामुळे अडचणीत आले आहे.यातूनच बीड जिल्हासह संपूर्ण राज्यातील पक्षांतर्गत आणि पक्षाबाहेरील विरोधक हे अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसवर तुटून पडले आहेत.हे सर्वजण राज्य अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा मागत आहेत. यासाठी नको त्या खालच्या स्तरावर जाऊन दादांपर्यंत सुद्धा आरोप केले जात आहेत. या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला ही बदनाम करण्याचा प्रयत्न सातत्याने होत आहे. एवढी बिकट आणि कठीण परिस्थिती आलेली असताना देखील अजितदादांनी अडचणीच्या काळात आपल्या कार्यकर्त्यांच्या पाठीशी किती ठामपणे उभे राहवे लागतं हे आज पर्यंत मुंडेंचा राजिनामा न स्वीकारता सिद्ध केलं आहे. त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्यांना नेतृत्व असावं तर असंच वाटणं स्वाभाविक आहे. दादा आज बीड जिल्ह्याला दुर्दैवाने जातीयवादाचा कलंक लागला जात आहे.तुम्हीच आता बीड जिल्हाला जातीयवादातून मुक्त करण्याचा वादा करा.आज समस्त बीडकरांना आपल्याकडून हीच अपेक्षा आहे.

लोकनेत्या स्वर्गीय केशर काकू क्षीरसागर, लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यासारख्या नेतृत्वाने बीड जिल्ह्याला खऱ्या अर्थाने राजकीय उंची देण्याचा प्रयत्न महाराष्ट्र ते दिल्ली पर्यंत केला. बीड जिल्हा राजकीय दृष्ट्या अधिक सक्षम करण्यासाठी त्यांच्या राजकीय वारसांनी देखील पुढे अनमोल योगदान दिले व देत आहेत.यासह प्रामुख्याने स्वर्गीय उपमुख्यमंत्री सुंदरराव सोळंके, माजी मंत्री शिवाजीराव पंडित,स्वर्गीय माजी मंत्री विमलताई मुंदडा,माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, माजी खासदार जयसिंग गायकवाड पाटील, विद्यमान कॅबिनेट मंत्री पंकजा मुंडे, विद्यमान कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांच्यासह लोकनियुक्त प्रत्येक लोकप्रतिनिधी यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. मागील काही वर्षापासून बीड जिल्हा हा ऊसतोड मजुरांचा जिल्हा, मागास जिल्हा म्हणून जी ओळख होती ती ओळख पुसण्याचे काम युद्धपातळीवर सुरू झाले होते.मात्र लोकसभा निवडणुकीमध्ये ओबीसी विरुद्ध मराठा असा राजकीय संघर्ष शिगेला

(उर्वरीत पान २ वर)



### जातीयवाद मिटवणाऱ्यांना प्रोत्साहन पर बक्षिसे जाहीर करा

## मुंडेंचा राजीनामा न घेणे जातीयवादाला तिलांजली देणंच ठरेल

मसाजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे मारेकरी कोण आहेत त्यांचे मास्टर माईंड कोण आहेत ? हे तपासात जसं जसं निष्पन्न होईल जो ही यामध्ये दोषी आढळेल त्यावर शासनाने आणि प्रशासनाने कायदेशीर कठोर कारवाई करणे निश्चितच गरजेचे आहे. या आरोपींना फासावर लटकवले पाहिजे तरच भविष्यात असा अत्याचार कोणी करणार नाही. मात्र या प्रकरणातील संशयित आरोपी हा कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्ती आहे म्हणून धनंजय मुंडे यांचा राजीनामा मागणे त्याच्यासाठी राजकीय जंग जंग पछाडणे योग्य नाही. संपूर्ण महाराष्ट्रात या घटनेवरून उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सुळावर धरले जात आहे.असे असताना देखील अजितदादा पवार यांनी जोपर्यंत धनंजय मुंडे या प्रकरणात दोषी आहेत असे सिद्ध होत नाही तोपर्यंत त्यांच्या मंत्रिपदाचा राजीनामा घेणार नाही असे ठासून सांगत खऱ्या अर्थाने होत असलेल्या जातीयवादाला एक प्रकारे तिलांजली देण्याचा प्रयत्न हा आदर्शवतच केला आहे.भविष्याच्या राजकारणात दादांचा आज घेतलेला हा निर्णय एक इतिहास होईल हे नक्की.

## टीआरपीसाठी वाद लावणाऱ्या मीडियावर देखील कारवाई करा

जर आपल्या सोशल मीडियाचा तसेच इलेक्ट्रॉनिक मीडियाचा किंवा प्रिंट मीडियाचा वाचक वाढवायचा आहे. वाचक वाढवून आपला गुगल पे वाढवायचा आहे.म्हणून जातीयवादाला खतपाणी घालणाऱ्या, आंदोलनकर्त्यांना भडकावू आंदोलन करण्याचा सल्ला देणाऱ्या, मीडियावर देखील योग्य ती कारवाई अथवा समज देणे दुर्दैवाने काळाची गरज झाले आहे. याचीही दखल दादा आपण उघडपणे घ्यावी.

## डीपीडीसी मधून करोडो रुपयांचा निधी मंजूर होईल पण...

दादा आज बीड जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आपण बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून करोडो रुपयांच्या निधींना मंजुरी द्याल.बीड जिल्ह्याचा या माध्यमातून विकास होण्यास पुन्हा एकदा सुरुवात होईल. हे आवश्यकच आहे. मात्र त्यासोबत दादा आता बीड जिल्ह्यात माणुसकीचा झरा देखील उभारणे गरजेचे झाले आहे. यासाठी काही विशेष निधीची तरतूद करता आली आणि यातून जर माणुसकी उभारली गेली व जातीयवादाचा विळखा तुटू शकला तर खऱ्या अर्थाने बीड जिल्ह्यात सुख शांतीचा नारा पुन्हा एकदा गाजेल.

## गुन्हेगारांना माफ करू नका, त्याचबरोबर जातीयवाद पसरवणाऱ्यांना सुद्धा सोडू नका...

बीड जिल्ह्यात वाढलेली गुंडगिरी नेस्तनाबूत करा.ज्यांनी खून केले, दरोडे टाकले, अत्याचार केले त्यांना जात नसते. ते फक्त गुन्हेगार असतात. गुन्हेगार कोणत्या जातीचा त्यावरून जातीवाद ज्यांनी कोणी पेटवला त्या गुन्हेगारांनाही दादा माफ करू नका. गुन्हे दाखल करून कारवाईचा बडगा उगारा. मग हा जातीयवाद त्याने आपल्या बोलण्यातून, सोशल मीडियातून, कृतीतून अथवा कोणत्याही माध्यमातून पसरवला असला तरी सुद्धा त्याला दोषी ठरवा. त्याच्यावर गुन्हे दाखल करून आजच जेलमध्ये पाठवा तरच बीड जिल्ह्यातला जातियवाद थांबेल.

## बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेसाठी ३०० कोटीचे सॉफ्टलोन देण्याची मागणी



बीड :-बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला कृषी व अकृषी कर्ज पुरवठा सुरु ठेवण्यासाठी राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातुन ३०० कोटी रुपयांचे सॉफ्ट लोन सवलतीच्या दरात देण्यात यावी अशी मागणी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी केली. बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विविध अडचणीच्या संदर्भात उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत झालेल्या बैठकीस दिल्ली येथून ते व्हीसी द्वारे सहभागी झाले. त्याचबरोबर बँकेच्या शाखांमध्ये आधुनिक भौतिक व तांत्रिक सुविधा निर्मितीसाठी १५ कोटी रुपयांची विशेष मदत शासनाने करावी आणि जिल्हा बँकेचे शासनाच्या विविध सवलत योजनेतील बाकी असलेले येणे शासनाने लवकरात लवकर अदा करावे, अशी विनंती केली.

या सर्वच विषयी अर्थ व नियोजन विभाग, राज्य सहकारी बँक, नाबार्ड यांच्याशी चर्चा करून सकारात्मक निर्णय घेतला जाईल, तसेच सहकार विभागामार्फत बँकेसाठी एक तज्ज्ञ अधिकारी दिला जाईल, असे आश्वासन दादांनी दिले. या बैठकीस श्री.अजित पवार सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांसह अर्थ व नियोजन

(उर्वरीत पान २ वर)

## पर्यावरण व वातावरणीय बदल

### पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम



बीड :- पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. गुरुवार दि. ३० जानेवारी २०२५ रोजी सकाळी ७.२० वाजता चिकलठाणा विमानतळ येथून उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांच्यासमवेत हेलिकॅप्टरने बीडकडे प्रयाण. सकाळी ८.०० वाजता पोलीस परेड ग्राऊंड, बीड येथे आगमन व शासकीय वाहनाने शासकीय विश्रामगृह बीडकडे प्रयाण. सकाळी ८.०५ वाजता शासकीय विश्रामगृह बीड येथे आगमन व राखीव. सकाळी ९.५५ वाजता शासकीय विश्रामगृह येथून शासकीय वाहनाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रयाण. सकाळी १०.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे आगमन व जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीस उपस्थिती. दुपारी १२.०० वाजता शासकीय विश्रामगृह बीड येथून परळी वैजनाथकडे प्रयाण. दुपारी १३.०० वाजता यश:श्री निवासस्थान परळी वैजनाथ जि. बीड येथे आगमन व राखीव. शुक्रवार दि.३१ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १७.०० वाजता यश:श्री निवासस्थान, परळी वैजनाथ जि. बीड येथून वाहनाने जालनाकडे प्रयाण.

## जुन्या पंचायत समितीतील स्वातंत्र्य सैनिकांचा स्मृती स्तंभ नवीन कार्यालयात उभारा - जवाहरलाल सारडा



### स्वातंत्र्यसैनिक उत्तराधिकारी संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांकडे रास्त मागणी

बीड ।प्रतिनिधी

भारतीय स्वातंत्र्य संग्रामात बलीदान दिलेल्या हुतात्मा झालेल्या, कारावास भोगलेल्या क्रांतीकारकांच्या स्मृती कायम भारतीय जनतेच्या स्मरणात राहण्यासाठी आणि जनतेस देशप्रेमाची प्रेरणा मिळणेसाठी महाराष्ट्र शासनाने प्रत्येक जिल्हयात, तालुक्यात स्वातंत्र्य सैनिकांचे स्मृतीस्तंभ उभारले आहेत. स्मृती स्तंभाची देखभाल व दुरुस्तीचे काम त्या भागातील स्थानिक स्वराज्य संस्था पंचायत समिती, नगर परिषद, महानगरपालिका, यांच्याकडे सोपविलेले आहे. मात्र दुर्दैवाने सदर स्थानिक संस्था स्मृती स्तंभाची देखभाल दुरुस्ती करत नाहीत. बीडच्या जुन्या पंचायत समितीमध्ये जो स्मृतिस्तंभ उभारण्यात आलेला आहे तो नव्या इमारतीमध्ये नव्याने दिमाखाने उभारणे गरजेचे होते. मात्र तसे झाले नाही. याची दखल घेऊन जिल्हाधिकारी यांनी पालकमंत्र्यांना ही बाब सांगून तात्काळ नव्या पंचायत समितीच्या इमारतीमध्ये स्वातंत्र्यसैनिकांचा स्मृतीस्तंभ उभारण्यास डीपीडीसी मध्ये मंजुरी द्यावी अशी मागणी स्वातंत्र्य

(उर्वरीत पान २ वर)

## पदोन्नती करूनच अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करावे आ.संदीप क्षीरसागरांची मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे मागणी

## शिक्षक संघटनांकडून आमरण उपोषणाचा इशारा



बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून सन २०२३-२४ च्या संच मान्यतेच्या आधारे अतिरिक्त शिक्षक समायोजन करण्याचे आदेश काढण्यात आले आहेत. परंतु पदोन्नती न करताच शिक्षकांचे समायोजन करणे हे शिक्षक बंधू-भगिनींवर अन्यायकारक ठरणार आहे त्यामुळे अगोदर पदोन्नतीची प्रक्रिया राबवून नंतरच समायोजन करावे अशी विनंती आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकार्यांकडे केली आहे. दरम्यान पदोन्नती न करताच समायोजन केल्यास गुरूवार (दि.३०) रोजी पासून आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा शिक्षक संघटनांकडून देण्यात आला आहे.

दि.२८ जानेवारी २०२५ रोजी बीड जिल्हा परिषदेकडून शिक्षकांच्या समायोजनाबाबत आदेश काढण्यात आला असून दि.३१ जानेवारी २०२५ रोजी शिक्षक समायोजन प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. परंतु सदरील समायोजन प्रक्रिया ही पदोन्नती प्रक्रिया न करताच करण्यात येणार असल्याने जिल्ह्यातील शिक्षक-शिक्षिका बांधवांवर अन्यायकारक ठरणार आहे. सन २०२३-२४ च्या संचमान्यतेच्या आधारे बीड जिल्हा

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG



## संपादकीय

# भलाईचा मानस!

भारत आणि चीनमधील राजनैतिक संबंधांच्या ७५व्या वर्धापनदिनानिमित्ताने तणाव निवळणे हा शुभशकुन आहे. पूर्वी अमेरिकेवर विसंबून असलेल्या भारतीय व्यापारी भागीदारीची धुरा आता सर्वांत मोठा व्यापारी भागीदार म्हणून चीनकडे चालत येणार आहे.

भारत आणि चीनचे उदात्त ध्येयाद्वारे पुनरुत्थान व्हावे, कारण या दोन्ही देशांनी प्रबोधनाची पहाट एकत्र अनुभवली आहे, असा विश्वास गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांनी कोणे एके काळी व्यक्त केला होता. त्यानंतरचा या दोन्ही देशांचा भूतकाळ मात्र परस्पर संबंधांच्या संदर्भात भूषणावह राहिला नाही. अलीकडील वर्तमानाचा मागोवा घेतला; विशेषत: मागील पाच वर्षे पाहिली तर चीन सबंधांबाबत भारतावर मोठे दडपण होते. संकटाच्या क्षणीही संवाद सुरू ठेवावा, कारण समस्यांचा अंत करण्याची शक्ती फक्त चर्चेत आहे, असे बोलले जाते. भारताने याच मात्रेवर भर दिला. प्रचंड तणावातही अजिबात विचलित न होता संतुलन ढळू न दिल्याचा परिपाक आज दिसतो आहे. भारत आणि चीनमधील राजनैतिक संबंधांच्या ७५व्या वर्धापनदिनानिमित्ताने तणाव निवळणे हा शुभशकुन आहे. पूर्वी अमेरिकेवर विसंबून असलेल्या भारतीय व्यापारी भागीदारीची धुरा आता सर्वांत मोठा व्यापारी भागीदार म्हणून चीनकडे चालत येणार आहे.

यंदाच्या उन्हाळ्यात मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू करण्याची घोषणा झाली आहे. यामुळे भारतीयांच्या आनंदाला आध्यात्मिक किनार लाभली आहे. सन २०२०मध्ये पूर्व लडाखमधील गलवान खोरे आणि पँगाँग त्सो जलाशयाजवळील संघर्षांनंतर मानसरोवर यात्रा ठप्प झाली होती. द्विपक्षीय संबंधांना भविष्यात बळकटी मिळण्याचे शुभसंकेत या घोषणेने दिले. मागील पाच वर्षांपासून बंद असलेल्या दोन्ही देशांमधील थेट उड्डाणांवर एकमत झाल्याने हा आनंद द्विगुणित झाला. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये ब्रिक्स शिखर परिषदेतील चर्चेचाही या घडामोडींशी संबंध आहे. रशियाच्या कझान शहरात पंतप्रधान मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात झालेल्या तासभराच्या संवादात सीमाक्षेत्रात शांतता प्रस्थापित करण्यावर भर देण्यात आला होता. कैलास मानसरोवर यात्रेच्या ताज्या घोषणेची पाळेमुळे त्या भेटीत आहेत. भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांच्या बीजिंग भेटीतील वाटाघाटींनी प्रत्यक्ष योजनेच्या जवळ पोहचविण्याचे काम केले. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांच्या अलीकडील दौऱ्याने चिनी अधिकाऱ्यांसोबतचे संबंध दृढ करण्यातील उर्वरित भूमिका पार पाडली. राजकीय सहकार्य स्तरावरील सतरा आणि वरिष्ठ सैन्याधिकारी स्तरावरील चर्चेच्या एकवीस फेऱ्यांचाही या शांतता प्रक्रियेत मोलाचा वाटा आहे.

संसदेच्या हिवाळी अधिवेशनातच परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी हे संकेत दिले होते. चीनसारखा कृतघ्न शत्रू पुढ्यात असतानाही भारताने संयम न गमावता आंतराराष्ट्रीय संवादाचे बोट सुटू दिले नाही. एप्रिल-मे २०२०मध्ये पूर्व लडाखमध्ये त्या देशाने नियंत्रण रेषेवर मोठ्या प्रमाणात सैन्याची जमवाजमव केल्याने अनेक ठिकाणी संघर्षाची स्थिती निर्माण झाली. त्यातून गस्तीच्या हालचालींवर अडथळा आला. एकीकडे रसद पाठविण्यात अडचणी असतानाही दुसरीकडे करोना परिस्थितीचा जिकिरीने सामना करीत जलद आणि प्रभावी प्रत्युत्तर देण्याचे खडतर काम भारतीय सैन्यदलांनी केले. नद्यांशी संबंधित जलविद्युत संदर्भांची आदानप्रदान करण्यावर आणि इतर सहकार्य वाढविण्यावरही सहमती झाली आहे. याशिवाय, माध्यमे, तज्ज्ञ मंडळी आणि जनतेमधील परस्पर संवाद वाढवण्यासाठीही उपाययोजना केल्या जातील. अनेक सांस्कृतिक आणि राजनैतिक कार्यक्रमांचे आयोजनही केले जाईल. चीनला त्यांच्या नागरिकांसह राजकीय आणि संशोधकांच्या व्हिसा प्रतिबंधांमध्ये सवलत हवी आहे. चिनी मोबाइल ॅप्सवर घातलेली भारतातील बंदी त्यांना हटवायची आहे. चिनी सिनेमाघरांमध्ये भारतीय चित्रपटांच्या परवानगीखेरीज चिनी पत्रकारांना भारतातील वार्तांकनाची मुभा मिळावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# न भूतो न भविष्यती असा सामुहिक हळदी-कुंकूवाचा कार्यक्रम राजस्थानी विद्यालयात संपन्न

## जवळपास दोन हजार महिलांची उपस्थिती

बीड । प्रतिनिधी

येथील मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालय व द्वारकादास मंत्री राजस्थानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात हळदी- कुंकवाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून माहेश्वरी महिला मंडळाच्या पदाधिकारी महेश महिला मंडळ अध्यक्ष सौ. शांता गिलडा, सचिव देवकन्या बंग, राजस्थानी महिला मंडळ अध्यक्ष सौ. लता बियाणी , सचिव सौ. पुष्पा कासट, बहु मडळ अध्यक्ष सौ. कविता कलंत्री, प्रगती महीला मंडळ सचिव सौ. किरण बियाणी, विप्र समाज सौ. सोनल जोशी, सौ. वैशाली खंडेलवाल, सौ. शारदा कासट, सौ अनिता बाहेती, सौ. सुनिता करवा, सौ. सविता जाजू , सौ. भारती मुंदडा, सौ. आरती कासट, सौ. मीरा भंडारी, सौ.



श्रुती बंब, सौ. सुरेखा नाईकवाडे,सौ. अर्चना सोहनी , सौ. स्वाती सोहनी, सौ. शोभा जेथलिया सर्व महिला मंडळातील सदस्या, परिसरातील सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस ,सखी सावित्री समितीच्या महिला सदस्या, माता पिता पालक संघाच्या सर्व महिला भगिनीउपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे सेल्फी पॉइंट(किल्ला) व ग्रामीण भागातील थीम (झोपडी) तसेच जातं, चूल बैलगाडी या अशा अनेक गोष्टी या ठिकाणी पालकांना पाहण्यास मिळाल्या.आपण मागील काही वर्षात वापरल्या जाणाऱ्या जुन्या वस्तू पाहून पालकांच्या डोळ्याचे जणू पारणेच फिटले. या कार्यक्रमाच्या प्रमुख जाजू मॅडम व सौ बियाळे मॅडम या होत्या. याच बरोबर चौथीच्या विद्यार्थ्यांनी बनवलेले किल्ले यांचेही यावेळी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी संस्थेचे सहसचिव किशोरजी बाहेती यांच्या हस्ते किल्ले प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव श्री.रामेश्वर कासट ,जेष्ठ संचालक राधेश्याम कासट , अशोक मंत्री , केदार जाजू (चकलांबेकर) या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. किल्ले बनवणे या उपक्रमाचे प्रमुख श्री तंबरे सर , तौर मॅडम हे होते. इयत्ता ४ थीच्या विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर व प्रभावी किल्ले संपूर्ण अभ्यासासह बनवले होते रायगड , शिवनेरी , प्रतापगड , तोरणागड , सिंधुदुर्ग असे महाराष्ट्रातील प्रख्यात किल्ल्यांचे हूबेहूब दर्शन पालकांना या निमित्ताने घडत होते , येणारा प्रत्येक माता - पालक आश्चर्य चकित होऊन बारकाईने या किल्ल्यांचे निरीक्षण व विद्यार्थ्यां कडून माहिती जाणून घेत होते. शाळेतर्फे सेल्फी पॉईंटच्या रुपात एक प्रत्यक्ष किल्याची प्रतिकृती बनवली गेली होती , महिला वर्गानी आवर्जून त्या ठिकाणी सेल्फी घेतली . संपूर्ण ग्रामीण जीवनाची थीम पाहून आलेला पालकवर्ग स्तिमित होत होता , अनेक महिलांना आवडीने चुलीवर भाकरी करण्याचा मोह आवरता आला नाही. जात्यावरच्या ओव्या ही अनेकांनी गायल्या.

संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना सुद्धा सेल्फी पॉईंट्स मोह आवरता आला नाही त्यांनी सुद्धा सेल्फी पॉइंट बैलगाडी व सर्व किल्ल्यांची पहाणी केली. व शाळेचे व सर्व स्टाफचे कौतुक केले.त्याचबरोबर द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालयाच्या सहशिक्षिका डॉक्टर करपे मॅडम यांनी या किल्ल्यांचे परीक्षण केले. माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांचे भव्य असे विज्ञान प्रदर्शन व चित्रकला प्रदर्शन ही या निमित्ताने भरवण्यात आले होते . विद्यार्थ्यांनी अप्रतिम चित्रे व अद्वितीय प्रयोग या निमित्ताने सादर केले.आलेल्या सर्व महिला, भगिनींना वान म्हणून

# पाटोदा मा.विद्यालयात बस चालक चौरे हौसराव रामभाऊ याचा सेवानिवृत्ती निरोप समारंभ उत्साहात संपन्न

बीड । प्रतिनिधी

बेलखंडी पाटोदा परिसरातील विद्यार्थी, ग्रामस्थाना चांगली व वेळेत सेवा देवून बसचालक श्री. चौरे हौसराव रामभाऊ यांनी परिसरातील नागरिकांची मने जिंकली. त्यानी उन, वारा, पाऊस यांची तमा न बाळगता उत्कृष्ट असे काम केल्यानंतर सेवा निवृत्त होत असून त्याचा शाळेच्या वतीने छोटेखानी सत्कार सोहळा संपन्न होत असल्याचे विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य धनवंत मस्के यांनी केले तर एस.टी.महामंडात चालक म्हणून प्रवासी सेवेचे काम केल्यानंतर निवृत्ती निमित्ताने होत असलेला येथील पाटोदा बेलखंडी विद्यालयाचा सत्कार कायम स्मरणात राहील असे बस चालक हौसराव चौरे यांनी प्रतिपादन केले.

मंगळवारी पाटोदा माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय पाटोदा बेलखंडी ता. जि. बीड या शाळेत एस टी महामंडळाचे बस चालक चौरे हौसराव रामभाऊ यांचा सेवानिवृत्ती निरोप समारंभ कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक तथा प्राचार्य धनवंत मस्के यांनी शाळेच्या वतीने कपडे शाल श्रीफळ देऊन त्यांचा यथोचित असा सत्कार करण्यात आला. महा वाचन चळवळ चौरे साहेब हे विद्यार्थ्यांसाठी एक चालक न राहता विद्यार्थी प्रिय चालक शाळेतलाच एक माणूस होऊन कधी गेले हे कळलेच नाही.त्यांचं शाळेसाठी सहकार्य खूप मोठे योगदानाचा ठरलं कारण डोंगर कपारीतून येणाऱ्या विद्यार्थ्यांना बसची सेवा अत्यंत वेळेवर व काळजीपूर्वक देणारे चालक म्हणून त्यांनी या परिसरामध्ये स्वतःची ओळख निर्माण केली. प्रत्येक अडचणीवर मात करून विद्यार्थी शाळेपर्यंत कसे पोहोचतील व नंतर घरापर्यंत पोहोचण्याची काळजी एक चालक नव्हे ते एक पालक म्हणून खूप मोठ्या उत्साहाने पार पाडणारे चालक म्हणून चौरे साहेब यांच्याकडे विद्यार्थी पाहत होते. त्यांच्या सेवानिवृत्ती वेळी अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या भावनाला वाट मोकळी करून दिली. विद्यार्थ्यांच्या भावना पाहून चालक चौरे साहेब यांनाही खूप मोठे गहिवरून आले अशा पद्धतीने हा कार्यक्रम पाटोदा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाटोदा बेलखंडी येथे खूप सुखाचा आणि बराचसा दुःखाचा असा पार पडला याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष धनवंत मस्के सर यांनी अध्यक्षीय समारोप मध्ये चौरे साहेबांचे शाळे विषयी योगदान खूप मोठ्या उदाहरणांनी व योग्य पद्धतीने विद्यार्थ्यांना पटवून सांगितले तसेच त्यांच्या भावी



कार्यासाठी त्यांना शुभेच्छा देऊन त्यांना दीर्घायुष्य आरोग्य सुख समृद्धी लाभो अशा शब्दांमध्ये शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्तावित श्री चोरमले सर यांनी केले शेवटी सर्वांचे गदळे सर यांनीआभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली यावेळी शाळेचे शिक्षक खोसे सर खाडे सर जोगदंड सर खेडकर सर काशीद सर गायकवाड सर काटवटे सर आदमाने सर शिक्षकेतर कर्मचारी श्री तिपाले सर वाघमारे आर आर शिंदे एस आर व विद्यार्थी खूप मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# मानाचा महाराष्ट्र उद्योग रत्न पुरस्कार

## बीडचे भूमिपुत्र सचिन डहाळे यांना नाशिक येथील समारंभात प्रदान

बीड । प्रतिनिधी

रेसिल इंडिया व नाशिकच्या समाचार वाणी यांच्या वतीने महाराष्ट्रात विविध उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय काम करणार्या उद्योजकांना महाराष्ट्र उद्योग रत्न हा पुरस्कार दिला जातो. बीडचे भूमिपुत्र सुप्रसिद्ध सराफा व्यापारी सचिन शिवदास डहाळे यांना देण्यात आला. ङ्गनाशिक येथील रेडिसन ब्ल्यू येथील शानदार कार्यक्रमात शुक्रवारी तारीख २४ श्री डहाळे यांना रेसिल इंडियाचे सीईओ सुधीर पठाडे, देशाच्या संरक्षण मंत्रालयांतर्गत येत असलेल्या अमिनेशन फॅक्टरीचे मुख्य व्यवस्थापक संजय हजारी व सुप्रसिद्ध अभिनेत्री तेजस्विनी पंडित यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ङ्गयावेळी देशातील नामांकित उद्योगपतींसह एम एस सी चे सहाय्यक संचालक अजय दप्तरदार, महाराष्ट्र शासन जीएसटी चे कमिशनर डॉक्टर चेतन सिंग राजपूत, सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री तेजस्विनी पंडित यांची प्रमुख उपस्थिती होती.

# यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन बीड येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

**म.शि.प्र.मंडळ संचलित, यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन, बीड येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या स्थानिक नियमक मंडळाचे सदस्य अँड.श्री. स्वप्निल गलधर यांच्या शुभहस्ते प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रम पार पडला. यावेळी श्री. स्वप्नील गलधर यांनी मनोगत व्यक्त करतांना सांगितले की,महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी एक उच्चतम अभियंता म्हणून बाहेर पडावे व आपल्या नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून**





**आपल्या हातून देशची सेवा घडावी व आपल्या राष्ट्राची प्रगती व्हावी, तसेच आपला एकोपा कायम राहवा असे सांगितले.**

या दिनाचे महत्त्व सांगताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापुरव गहिनीनाथराव मरलापल्ले म्हणाले की, संपूर्ण जगभरात सर्वात मोठे प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून भारताची ओळख आहे.भारतीय संविधानातील स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांमुळेच आज भारताची एकता टिकून आहे. या मूल्यांचा आदर करून प्रत्येक नागरिकांनी ती आत्मसात केली पाहिजेत,मूलभूत अधिकार , मूलभूत कर्तव्ये हे भारतीय राज्यघटनेचे विभाग आहेत जे राज्यांच्या नागरिकांप्रती असलेल्या मूलभूत जबाबदाऱ्या आणि राज्यासाठी नागरिकांचे कर्तव्य आणि अधिकार दर्शवतात याचे सर्वांनी पालन केले पाहिजे.

या वेळी प्रा.श्री. शिनगारे एस. टि यांनी सांगितले की,२६ जानेवारी या दिवशी सर्व भारतीय एकत्र येऊन हा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करतात. स्वातंत्र्यानंतर जवळपास तीन वर्षांनी आपला देश सार्वभौम, धर्मनिरपेक्ष, समाजवादी, लोकशाही प्रजासत्ताक म्हणून अस्तित्वात आला, याचा सर्व भारतीयांना सार्थ अभिमान आहे.असे प्रतिपादन त्यांनी या वेळी केले.यावेळेस महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## पान १ वरून...

**बीड जिल्हा मध्यवर्ती ...**

विभाग, राज्य सहकारी बँक तसेच नाबार्डचे अधिकारी, बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक तसेच जिल्हा बँकेचे प्रशासकीय मंडळ आदी उपस्थित होते.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी प्रशासक मंडळाच्या कामाचे कौतुकही केले. बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून शेतकरी वर्गाला दिलासा देण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल मुंडे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले.

**जुन्या पंचायत समितीतील ...**

सैनिक उत्तराधिकारी पाल्य संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

जुन्या पंचायत समिती कार्यालय, बीड येथील सदर जुना स्मृती स्तंभ हा नवीन कार्यालयात नव्याने उभारण्यात यावा व त्याची दरवर्षी २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन, १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन व १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी देखभाल, दुरुस्ती व सुशोभिकरण करण्यात यावी अशी मागणी अखिल भारतीय स्वातंत्र्य सैनिक उत्तर अधिकारी संघटनाचे अध्यक्ष स्वातंत्र्य सैनिक पाल्य जवाहरलाल सारडा, संघटनेचे सचिव वैभव स्वामी, उपाध्यक्ष जयप्रकाश कैवाडे यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

**पदोन्नती करूनच अतिरिक्त...**

परिषद शिक्षण विभाग यावेळी अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करणार आहे. परंतु मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व पदवीधर शिक्षकांची पदोन्नती अगोदर केल्यास सहशिक्षकांची पदे रिक्त होतील जेणेकरून अतिरिक्त शिक्षकांना समायोजनासाठी जागा उपलब्ध होतील आण त्यांच्यावर समायोजनाबात कुठलाही अन्याय होणार नाही. परंतु शिक्षण विभागाकडून घाई घाईने पदोन्नती न करताच समायोजन करण्याचा घाट घातल्याने जिल्ह्यातील अनेक शिक्षक-शिक्षिका बांधवांवर अन्याय होईल. त्यामुळे दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी

## पान १ वरून...

होणारी समायोजन प्रक्रिया स्थगित करून अगोदर मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व पदवीधर शिक्षक यांची पदोन्नती करण्यात यावी अशी मागणी आमदार संदीप क्षीरसागर यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे.

**अजित 'दादा' बीड...**

गेला आणि खऱ्या अर्थाने जातीय विष पेरले जाण्यास सुरुवात झाली. लोकसभेत पेटलेला जातिवाद हा आत्मचिंतन करण्यास भाग पाडणारा ठरला होता. तत्पूर्वी मराठा आरक्षणाची झळ बीड जिल्ह्याला दगडफेक, जाळपोळीच्या विध्वंसक घटनेतून सहन करावी लागली होती. या दुःखातून सावरत नाहीत तोच केज मतदार संघातील मसाजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या झाली. या हत्येतील जेही प्रत्यक्ष दोषी आहेत आणि हे करायला भाग पाडणारे जे ही पडद्यामागील दोषी आहेत त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. मात्र याही प्रकरणातून दुर्दैवाने राजकीय विरोध करत आपली स्वतःची राजकीय पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न केला जात आहे.मात्र यामुळे बालवयापासून ते वृद्धापकाळपर्यंत च्या मंडळीमध्ये जातीयवाद पेरला जात आहे. जर ओबीसीचे घर असेल, दुकान असेल तर त्यावर इतर समाजाने बहिष्कार टाकायचा. आणि जर मराठा समाजाचे घर दुकान असेल तर त्यावर ओबीसी समाजाने बहिष्कार टाकायचा. इतक्या खालच्या स्तरापर्यंत बीडमध्ये जातीयवाद पसरला जावू लागला आहे. आज दुर्दैवानं आधी आडनाव विचारलं जातं त्याची जात ठरवली जाते आणि पुढे मग त्याच्यासोबत व्यवहार ठरवला जातो.असे चित्र बीड जिल्ह्यात यापूर्वी कधीच नव्हते. दादा मागील वर्षभरात बिघडलेले हे वातावरण जर वेळीच सुधारले नाही तर येणाऱ्या अनेक पिढ्या या पिढीला माफ करणार नाही हे नक्की. त्यामुळे दादा आता तुम्हीच बीड जिल्ह्यात पसरत असलेला जातीयवाद थांबवण्याचा बीडकरांना ठाम वादा देऊनच जावं आज विकासापेक्षा याची खरी गरज आहे असं म्हटलं तरी वावगं ठरू नये.

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अंबड जि.जालना**

**सोपान आसाराम रत्नपारखेरा. आलमगाव**

**विरुध्द**

**ग्रामपंचायत कार्यालय / नगर परिषद आलमगाव ता.अंबड**

विषय:- कलम १३(३)जन्म - मृत्यू नोंदणी कायदा प्रमाणे जन्म-मृत्यू प्रमाणपत्र मिळणेबाबत तलाठी /ग्रामसेवक मधील जाहीर प्रगटण करणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार नामे सोपान आसाराम रत्नपारखे रा. आलमगाव ता.अंबड जि. जालना येथील राहिवाशी असुन अर्जदार यांनी त्यांच्या मुलगा नामे माझे धर्मराम सोपान रत्नपारखे यांची त्यांनी मृत्यूची यांची मृत्यू दि. ०१/०१/२००४ रोजी आलमगावअसल्याचे अर्जात नमूद केले असुन त्या अनुशंगाने त्यांनी मृत्यू प्रमाणपत्र आदेश मिळण्यासाठी त्यांनी या न्यायालयात/ अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी, सदर जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते कि, जन्म / मृत्यू नोंद बाबत कोणाचाही कोणताही अक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत लेखी स्वरूपात अक्षेप सादर करावा जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप या कार्यालयास प्राप्त झाला नाही तर संबधित प्रकरणात कायदयाप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि. १६/०१/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले जाते.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार अंबड**

# जिल्हा क्रीडा संकुल बीड येथे जिल्हास्तरीय सूर्यनमस्कार प्रशिक्षण व स्पर्धा संपन्न – विनायक वझे

बीड । प्रतिनिधी

जागतिक सूर्यनमस्कार दिनानिमित्त जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व क्रीडा भारती बीड योग संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने बीड येथील दिनांक २७ जानेवारी २०२५ एक दिवशीय निशुल्क सूर्यनमस्कार प्रशिक्षण व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या यामध्ये जिल्हाभरातून ६० पेक्षा जास्त योगप्रेमी शिक्षकांनी सूर्यनमस्कार प्रशिक्षण व स्पर्धा घेण्याचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी सकाळी नऊ ते दुपारी दोन तीस पर्यंत या सर्वांनी सूर्यनमस्काराचे प्रशिक्षण शास्त्रशुद्ध




पद्धतीने घेतले. यामध्ये प्रशिक्षणार्थींना उत्तम रित्या सूर्यनमस्कार प्रात्यक्षिक सादर केल्या बद्दल त्यांची निवड करून त्यांना श्री अरविंद विद्यागर बीड जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी निवड झालेल्या व उल्लेखनीय प्रशिक्षण घेतलेल्या योग प्रेमिकांना व प्रशिक्षणार्थींना गौरव करून त्यांचा सन्मान केला.त्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र ट्रॉफी आणि गोल्ड मेडल प्रदान करण्यात आले.

यामध्ये बीड जिल्ह्याचे क्रीडा भारती मंत्री विनायकराव वझे,अरविंद विद्यागर जिल्हा क्रीडा अधिकारी बीड व सूर्यनमस्कार स्पर्धेचे बीड जिल्हा समन्वयक डॉ.आर के आरसुळ यांनी या कार्यक्रमाचे प्रशिक्षणाचे नियोजन केले होते.यामध्ये राज्यस्तरीय मास्टर ट्रेनर प्रशिक्षक राधिका तांबे. उद्धव लाड. डॉक्टर ज्ञानेश्वर घोडके. अक्षय पवळ. श्री गवते सर. सुनिता सुरवसे हे मास्टर ट्रेनर म्हणून प्रमुख उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन डॉ.ज्ञानेश्वर घोडके यांनी केले. प्रस्तावना विनायकराव वझे यांनी केली. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी प्रमुख पाहुणे म्हणून बीड जिल्ह्याचे क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी मार्गदर्शन केले.

# ए.एच. वाडिया सार्वजनिक वाचनालयात भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण संपन्न

बीड । प्रतिनिधी

ए.एच. वाडिया सार्वजनिक वाचनालयात भारतीय प्रजासत्ताक दिन यानिमित्त दि. २६-०१-२०२५ रोजी सकाळी ९.३० वा. वाचनालयाचे कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष डॉ. अनुराग पांगरीकर यांच्या हस्ते राष्ट्रपिता म. गांधी यांच्या फोटो प्रतिमेचे पूजन करुन ध्वजारोहण संपन्न झाले.



यावेळी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष श्री. अमोलकचंदजी सुराणा, सदस्या डॉ. हेमलता पाटील, वार्षीक सर्वसाधारण सभेचे उपाध्यक्ष डॉ. अरुणराव सातपुते, सरचिटणीस ॲड. गोविंद कासट, संचालक मंडळातील सौ. निलीमाताई पाटंगणकर, ॲड. आनंद पाटील, ॲड. अजिंक्य पांडव, प्रा. विवेक वैद्य, दीपक कर्नावट, जयप्रकाश कैवाडे, यांच्यासह धर्मादाय कार्यलयाचे अधिक्षक श्री. सुग्रीव सपकाळ, श्री. काळे सर, श्री. मुरलीधर राऊत, संस्कार विद्यालयाचे शिक्षक श्री. प्रेरक वैद्य, चंपावती विद्यालयाच्या शिक्षीका सौ. पवार जे.एस. यांच्यासह संस्कार शाळेतील विद्यार्थी, कर्मचारी वृंद ग्रंथपाल ग्रंथमित्र गणेश शेंडगे, श्री. ठोसर के.आर, श्री. कुमार देशमुख, संतोष जगताप, रामेश्वर जाधव, जोशी रमेश, वाचक, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खांडेपारगांव हायस्कूलमध्ये भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नवगण शिक्षण संस्था राजुरी (न) संचलीत खांडेपारगाव हायस्कुल खांडे पारगाव ता.जि. बीड या शाळेत भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळा व शाळेच्या प्रांगणात पताका लावुन रांगोळी काढून शाळा सजवण्यात आली व नंतर गावातून प्रजासत्ताक दिनाच्या घोषणा देत प्रभात फेरी काढण्यात आली. ठीक ८:३० वाजता शाळेचे मुख्याध्यापक सचिन पवार यांच्या हस्ते



ध्वजारोहण संपन्न झाले. तदनंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांचे स्वागत हे स्वागत-गीताने करण्यात आले. व नंतर देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम झाल्यावर शालेय शिक्षण व क्रिडा विभागा मार्फत विविध उपक्रम यामध्ये भाषण, चीत्रकला, निबंध, कविता वाचन, नृत्य अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. शालेय व क्रिडा विभागा अंतर्गत विविध स्पर्धेतून विजयी स्पर्धकांना कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते बक्षीसांचे वाटप करण्यात आले. काही विद्यार्थी व शिक्षकांनी आपले विचार मांडले. शेवटी अध्यक्षीय समारोपात शाळेचे मुख्याध्यापक सचिन पवार यांनी सर्वानां भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देत सखोल मार्गदर्शन केले. पुढे आपल्या भाषणातून शालेय व क्रिडा विभागामार्फत प्रजासत्ताक दिनी घेतल्या गेलेल्या स्पर्धेतून विजयी स्पर्धकांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राठोड सरानी तर आभार प्रदर्शन रसाळ सरानी केले. विद्यार्थ्यांना खाऊ वाटपा नंतर कार्यक्रमाची सांगता

# ग्रंथ वाचनातून, साहित्यातुन चांगल्या विचाराची माणसे घडतात – जिल्हा ग्रंथालय अधिकारी

## जिल्हयात ११ व १२ फेब्रुवारीला ग्रंथोत्सव

बीड । प्रतिनिधी

ग्रंथ वाचनातून आणि साहित्यातुन चांगल्या विचाराची माणसे घडतात, वाचनाने सामाजिक, सांस्कृतिक एतिहासिक मुल्यांची जोपासना होते. ग्रंथ हे समाजाची जाण आणि भान निर्माण करते. नवीन पिढीला साहित्याची व वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांच्या ज्ञानात भर पडावी म्हणून ग्रंथोत्सवाची आवश्यकता असल्याचे ग्रंथोत्सव जिल्हा समन्वय समितीची बैठक जिल्हा ग्रंथालय येथे जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली त्यावेळी त्यांनी हे विचार व्यक्त



केले.

या बैठकीस माध्यमिकचे उपशिक्षण अधिकारी, एम. जी. हजारे, जिल्हा ग्रंथालय संघाचे कोषाध्यक्ष पवन गिरवलकर, मसापा शिरुर शाखेचे अध्यक्ष डॉ.अशोक घोळवे तसेच ऑनलाईन पध्दतीने छत्रपती संभाजी नगरचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सु. स. हूसे तसेच ग्रंथालीयातील कर्मचारी उपस्थित होते.बीड जिल्हयातील शिरुर कासार येथे दि. ११ व १२ फेब्रुवारी २०२५ रोजी होणा-या ग्रंथोत्सवाची रुपरेषा ग्रंथदिडी, उद्धाटन, बालकवी संमेलन, जेष्ठांच कथा कथन, परिसंवाद, निमंत्रितांचे कविसंमेलन आणि ऐन वेळेचे विषय याविषयी जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के यांनी माहिती दिली उपस्थित सदस्यांचा ग्रंथ व शाल देऊन सत्कार करण्यात आला.

## गोरक्षक गोपाल उनवणे यांच्यावर हल्ल्या करणार्या आरोपींना अटक करुन

# १०९ प्रमाणे गुन्हा दाखल करावा – सोमेश कदम

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील चकलांबा परिसरात गोरक्षक गोपाल उनवणे यांच्यावर हल्ल्या करणार्या आरोपींना अटक करुन १०९ प्रमाणे गुन्हा दाखल करावा अशी मागणी मनसेचे जिल्हासचिव सोमेश कदम यांनी पोलीस अधिक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.पुढे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दिनांक २७/०१/२०२५ रोजी रात्री ९.०० वा. पोलीस स्टेशन चकलांबा परिसरात गोरक्षक गोपाल उनवणे यांच्यावर तु गोरक्षन करतो का ? आमच्या कत्तल खाण्यात जात असलेल्या गाईचे व जणावरांचे टेम्पो पकडतो का म्हणुन जिवघेणा हल्ला केला. आरोपी ऐवढे क्रूर आहेत की, त्यांनी पोलीस स्टेशन परिसरात फिर्यादीवर जिवघेणा हल्ला केला. त्याना यावरुन कायद्याचा कसलाही धाक नाही असे निदर्शनास येते. हल्ला केलेले आरोपी संघटीत असुन गोरक्षकाला जिवे मारण्याच्या धमक्या दिलेल्या आहेत. पोलीस प्रशासन देखील कत्तलखाण्यात गाई नेत असल्याची माहिती दिल्यावर कार्यवाही करत नाहीत. उलट माहिती देणार्या गोरक्षकाला आरोपी सारखे वागणुक देतात पोलीस स्टेशन परिसरात आरोपींनी यावेळी हल्ला केला पुढील वेळेस ते घरी येवुन हल्ला करु शकतात.तरी प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेवुन संबंधीत आरोपींना तातडीने अटक करुन त्यांच्यावर १०९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच यापुढे कत्तल खाण्यात गाई घेऊन जात असल्यास माहिती मिळाल्यास तातडीने कार्यवाही करावी अशी मागणी केली आहे.

# स्पर्धा परीक्षेतील यशाकरिता भाषेवर प्रभुत्व हवे – ॲड. राजेंद्र लातूरकर

लातूर । प्रतिनिधी

मराठी भाषा, साहित्य, वाङ्मय, अनुवाद क्षेत्रात रोजगाराच्या विविध संधी आज उपलब्ध आहेत. कोणत्याही स्पर्धा परीक्षेच्या यशाकरिता भाषेवर प्रभुत्व मिळणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विधीज्ञ राजेंद्र लातूरकर यांनी केले.महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील मराठी भाषा, साहित्य, वाङ्मय व संस्कृती विभाग यांच्या वतीने आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या समारोप सभारंभात स्पर्धा परीक्षा व मराठी व्याकरण या विषयावर साधनव्यक्ती म्हणून ते बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते. तर विचारपीठावर मराठी विभागप्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे आणि प्रा. मारुती माळी हे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी जगत् ज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मराठी भाषा व वाङ्मय मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या स्वरचित अस्मिता या भीत्तीपत्रकाच्या काव्यविशेषांकाचे विमोचन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.

आपल्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, प्रत्येक मराठी भाषिकांनी मातृभाषेचा अभिमान बाळगायला हवा. सर्व तऱ्हेच्या व्यवहारात भाषेचा वापर अनिवार्यपणे केला जावा. भाषेविषयक अनास्था न बाळगता भाषेचा



गौरव कसा वाढेल याकडे भाषिकांनी लक्ष द्यायला हवे, असेही ते म्हणाले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. मारुती माळी यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. सागर ठाकूर यांनी मानले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता प्रा. व्यंकट दुडिले, प्रा. शंकर भोसले, प्रा मनीषा भुजबळ, बालाजी डावकरे, संतोष यंचेवाड, सय्यद जलील आदींनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चिकन अंडी खाणे शंभर टक्के सुरक्षित

## नांदेडमध्ये बर्ड फ्लूची लागण नाही

नांदेड । प्रतिनिधी

बर्डफ्लू आजारासंदर्भात नागरिकांनी कोणत्याही अफवांना बळी पडू नये. उकळलेली अंडी व शिजवलेले चिकन खाणे मानवी आरोग्यास पूर्णपणे सुरक्षित आहे. जिल्ह्यामध्ये बर्ड फ्लूची लागण झालेली नाही. त्यामुळे यासंदर्भात समाजमाध्यमांवर फिरणारे संदेश व काही माध्यमातून आलेल्या चुकीच्या बातम्यांना बळी पडू नका. चिकन, अंडी खाणे शंभर



टक्के सुरक्षित असल्याचा खुलासा पशुसंवर्धन विभागाने केला आहे. यासंदर्भात एक चित्रफित पशुसंवर्धन विभागाचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले यांनी जारी केली आहे. पशुसंवर्धन विभागामार्फत या आजारासंदर्भात अतिशय काटेकोरपणे लक्ष ठेवण्यात येत असून आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. नागरिकांनी अफवांना बळी पडू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, भोकरदनच्या नामांतर सोहळ्याचे कार्यक्रमाचे निमंत्रण न देण्याचा खुलासा सादर करा

## –डॉ.कल्याण काळे, खासदार, जालना

लोकप्रतिनिधी कायद्याच्या उल्लंघनाचा खुलासा सादर करणे बाबत.

भोकरदन येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, भोकरदनचे स्वातंत्र्य सेनानी पुंडलिक हरी दानवे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था भोकरदन, जि.जालना चा नामांतर सोहळा शनिवार, दिनांक २५.०१.२०२५ रोजी आयोजन करण्यांत आला होता. या कार्यक्रमाची पुर्वकल्पना मला देण्यांत आली नव्हती. तसेच कार्यक्रम पत्रिकेत व कोनशिलेत प्रोटॉकॉलप्रमाणे नावाचा समावेश करण्यांत आला नाही ही बाब अतिशय गंभीर स्वरूपाची आहे. परंतु आपण त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसुन येत आहे.

लोकप्रतिनिधी कायद्याचे आपण उल्लंघन केलेले आहे. आपली ही वर्तणुक जालना लोकसभा मतदारसंघाचा सदस्य या नात्याने लोकप्रतिनिधींचा सन्मानाची वागणुक देणे हे आपल्या कर्तव्याचा भाग असतांना देखील अशा प्रकारचे बेजबाबदार वर्तन करून माझा व माझ्या लोकसभा सदस्यत्वाचा तसेच मतदारसंघाचा जाणिवपुर्वक अवमान केला आहे. जालना लोकसभा मतदारसंघाचा लोकप्रतिनिधी म्हणुन संसदीय लोकशाहीमध्ये माझे कर्तव्य, जबाबदारी व अधिकार आहेत. मात्र आपल्या अशा वागण्याने माझ्या कर्तव्यात, हक्कात, अधिकारात तसेच कामात अडथळा निर्माण झाला आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.विमंस २०१३/प्र.क्र.६७/१८ (र.व का.), दिनांक २७.०७.२०१५ व सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.विमंस-२०१३/प्र.क्र.६७ /१८ (र.व का.), दिनांक १७.०१.२०१४ अन्वये विधानमंडळ / संसद सदस्याला अशाप्रकारे दुर्लक्षित करणे, सन्मानपुर्वक वागणुक न देणे ही बाब एक प्रकारे लोकसभा सदस्याचा हक्कभंग करणारी आहे. आपल्या विरोधात विशेष हक्कभंग समितीकडे हक्कभंगाची कारवाई करण्यासाठी प्रस्ताव दाखल करणार आहे.

आपण उपरोक्त प्रकरणी ४८ तासात तात्काळ व्यक्तीशः खुलासा सादर करावा. आपण खुलासा सादर न केल्यास आपले काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून आपणांवर हक्कभंगाची कारवाई करण्यासाठी प्रस्ताव दाखल करणार असल्याची नोटीस खा.डॉ.कल्याण काळे यांनी डी.एम.राठोड, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जालना. के.बी.ठाकुर, प्राचार्य तथा सदस्य सचिव, आय.एम.सी., आयटीआय, भोकरदन, जि.जालना, आ.के.जाधव, शि.नि.तथा सदस्य, आय.एम.सी., आयटीआय, भोकरदन, जि.जालना, एस.एस.नाईक, समन्वयक, आय.एम.सी., आयटीआय, भोकरदन, जि.जालना यांना दिली व डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हाधिकारी, जालना जिल्ह्याचे प्रमुख म्हणुन काय कारवाई करणार असे पत्र पाठविले.

याबाबत जिल्हा राठोड यांनी खुलास सादर केला की, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जालना हे जिल्हास्तरीय कार्यालय असुन वरिष्ठ कार्यालयास पत्र/माहितीची त्वरीत देवाण घेवाण करण्यासाठी सदरील कार्यालय आहे. तसेच सदरील कार्यालय कोणत्याही शासकीय कार्यक्रम घेण्या बाबतची परवानगी देण्याचे अधिकार या कार्यालयास नाही त्यामुळे संबंधित कार्यक्रमाशी या कार्यालयाचा कुठलाही एक संबंध नाही. परंतु त्यांनी प्राचार्यांना पत्र पाठवुन या नामांतर सोहळ्यासाठी प्रोटॉकॉल प्रमाणे व लोक प्रतिनिधी कायद्याच्या सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. विमंस २०१३/प्र.क्र.६७/१८ (र.प. का), दिनांक २७.०७.२०१५ व सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.विमंस-२०१३/प्र.क्र.६७/१८ (र.व.का.), दिनांक १७.०१.२०१४ अन्वये विधानमंडळ/संसद सदस्यांना प्रोटॉकॉल प्रमाणे मा. जिल्हाधिकारी महोदय व मा. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांच्या मान्यते नुसार परवानगी घेऊन तयार करावयाची होती परंतु आपण परस्पर वरिष्ठ कार्यालयाची परवानगी/मान्यता न घेता तुम्ही तुमच्या स्तरावरुन निमंत्रण पत्रिका व कार्यक्रमाचे नियोजन केले असे दिसुन येत आहे.

तरी आपण संदर्भीय पत्रान्वये मा. डॉ. कल्याण वैजिनाथराव काळे, संसद सदस्य (लोकसभा) जालना यांचे निमंत्रण पत्रिकेमध्ये नाव न टाकता व त्यांना न बोलता कार्यक्रम आयोजित करुन नामांतरणांचा कार्यक्रम पार पाडला आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधी कायद्याचे उल्घंन झाल्याचे निर्देशनात आले आहे. त्यामुळे आपण आपल्या स्तरावरुन संस्थाप्रमुख या नात्याने खुलास २४ तासांच्या आत सादर करावा जर खुलास सादर न केल्यास आपल्या विरोधात संदर्भीय पत्रान्वये विशेष हक्कभंग समितीकडे हक्कभंगाची कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव दाखल करण्यात येणार आहे यांची आपण गार्भियाने नोंद घ्यावी असे पत्र पाठविले.

या संदर्भात प्राचार्याने खुलसा सादर करतांना असे म्हटले की, स्वातंत्र सेनानी पुंडलिक हरी दानवे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था भोकरदन जि. जालना संदर्भ क्र.१ व २ अन्वये खुलासा सादर करण्यात येते की, दि. २५.०१.२०२५ रोजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, भोकरदन जि. जालना या संस्थेचे नामांतरण स्वातंत्र सेनानी पुंडलिक हरी दानवे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था भोकरदन जि. जालना असे करण्या करीता नामांतरण सोहळा आयोजित करण्या करिता दि. २१.०१.२०२५



मंगळवार रोजी स्थानिक लोकप्रतिनिधी मा. आमदार श्री. संतोष रावसाहेब दानवे यांच्या कार्यालयातुन स्वीय सहाय्यक यांच्या मला व्यक्तिशः फोन करुन बोलवण्यात आले होते, त्यावेळी बोलवण्याचे उदिष्ट विचाराले असता त्यांनी मला सांगितले की आपण पहिले कार्यालया मध्ये या त्यानंतर चर्चा करु असे सांगितले, तिथे गेलो असतां त्यांनी मला कळविले की शासन निर्णयानुसार बदलण्यात आलेले शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नामांतारणाचा कार्यक्रम करावयाचा आहे अशा सुचना दिल्या त्यानुषंगाने मला सांगितले की निमंत्रण पत्रिका व कोनशीला आम्ही सागु त्याप्रमाणेच करुन आना आणि कार्यक्रम तात्काळ दोन दिवसातच घेण्यात यावा असे सांगितले. परंतु मी त्यांना कळविले की सदर कार्यक्रम हा शासकीय असल्याने मला नियमा प्रमाणे सर्व लोकप्रतिनिधी यांना कळवुन त्यांना निमंत्रण दयावे लागेल व निमंत्रण पत्रिकेमध्ये नाव टाकावे लागेल असे म्हटल्यानंतर ते मला म्हणाले की पत्रिक तयार करून आणा त्यानुसार संस्थेतील कर्मचाऱ्याऱ्यांनी निमंत्रण पत्रिका शासकीय नियमानुसार तयार केली परंतु त्यांनी सदर पत्रिका मान्य केली नाही आणि मी सुचवल्या प्रमाणे पत्रिका तयार करा असे सुचविले त्यानुसार पत्रिका तयार केली.

परंतु सदर निमंत्रण पत्रिका ही कुठेही वाटप केलेली नाही. परंतु स्वातंत्र सेनानी पुंडलिक हरी दानवे यांचे कुटुंबांना अमंत्रित करणे गरजेचे असल्याने त्यांना सदर निमंत्रण पत्रिका देण्यात आली होती.

सदर कार्यक्रम तालुकास्तरावर घेण्याची आमची मानसिकता नव्हती कारण मा. संचालक महोदयांनी सुचविल्या प्रमाणे दिनांक २३.०१.२०२५ रोजी जिल्हास्तरीय क्रिडा स्पर्धाचे आयोजन असल्याने सर्व कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी हे क्रिडा स्पर्धाच्या तयारी व्यवस्थेत होते आणि माझ्या कडे सिल्लोड येथील कार्यभार असतांना देखील भोकरदन येथील कार्यभार हा प्रभारी असल्याने सदर नामांतरणाचा कार्यक्रमाची तयारी ही भोकरदन येथील कार्यालयीन कर्मचाऱ्यांना नियोजन करण्याच्या सुचना दिल्या परंतु स्थानिक लोकप्रतिनिधीच्या स्वीय सहायकाने केलेल्या सूचनेनुसार अल्पवधीत कार्यक्रम घेण्याच्या सुचना दिल्या त्यामुळे कर्मचारी वर्गाने कोणत्याही शासकीय कार्यालय व प्रसिध्द माध्यमांना कळविण्यात आले नाही. फक्त कर्मचारी आणि प्रशिक्षणार्थ्यांना बोलविण्यात आले होते.

सदर कार्यक्रम मोठा व्हावा असा मानस असतानाही सदर कार्यक्रमाच्या सुचनामुळे दबावात येऊन हा कार्यक्रम त्यांनी सांगितल्या नुसार घेण्यात आला त्यामुळे अनावधाने आपले नाव निमंत्रण पत्रिकेमध्ये टाकण्याचे राहिले व निमंत्रण देण्याचे देखील राहुन गेले त्याबदल मी आपली दिलगिरी व्यकत करतो. सदर एक वेळची बाब म्हणुन पहिली व शेवटची चुक मान्य करुन मला क्षमा करण्यात यावी व सदर खुलासा मान्य करावा हि नम्रपूर्वक विनंती असे के.बी. ठाकुर म्हणाले.

माझ्याकडे समन्वयक म्हणून सदर कार्यक्रमाच्या मंडप व बैठक व्यवस्थेची जबाबदारी होती. माझ्या मार्फत कोणासही निमंत्रण देण्यात आलेले नाही. व्यक्तीशः मी स्वत: आपला हेतूपुरस्सर अवमान होईल असे कोणतेही काम झालेले नाही तरीही अनावधानाने झालेल्या चुकीबद्दल दिलगीरी व्यक्त करतो असे नाईक एस.एस. यांनी केले. तर जाधव यांनी संस्था प्रमुखांच्या निर्देशानुसार कार्यक्रम पत्रिका व कोनशिला तयार करण्यांत आली होती. मी एक कर्मचारी म्हणुन कार्यक्रमास हजर होतो. संस्थेच्या निर्णय प्रक्रियेत शासन नियमाप्रमाणे संस्था प्रमुख निर्णय घेतात. संस्थेच्या निर्णय प्रक्रियेमध्ये मी सहभागी नसल्यामुळे इतर मुद्दे मला सुचवता आले नाही. याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो. सदरची एकवेळची बाब म्हणुन पहिली व शेवटची चुक मान्य करून मला क्षमा करण्यांत यावी अशी विनंती केली.

# विषेश पोलीस महानिरीक्षक व पोलीस अधीक्षकांनी घेतला पोलीस ठाण्यांच्या कामगीरीचा आढावा

## चांगली कामगीरी बजावणाऱ्या अधिकारी व अंमलदारांचा केला सत्कार

बीड ।प्रतिनिधी

दिनांक २८/०१/२०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. वीरेन्द्र मिश्र व पोलीस अधीक्षक, बीड श्री. नवनीत काँवत यांनी बीड जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, शाखा प्रभारी अधीकारी यांची गुन्हे आढावा बैठक घेवुन पोलीस ठाणे कामकाजाचा आढावा घेतला. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा यावेळी प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

बीड जिल्ह्यात दाखल खुन, खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरी चोरी, घरफोडी, व इतर दाखल गुन्हे तसेच दारु, जुगार, अवैध वाळू उपसा वाहतुक, गुटखा, अवैध जनावरांची वाहतुक, यासबधाने दाखल व उघड गुन्ह्यांची आकडेवारीची माहीती घेवुन विनाउघड गुन्हे उघड करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करण्याच्या सुचना देण्यात आल्या.बीड जिल्ह्यात सन २०२४ या वर्षात खुनाचे ४० गुन्हे दाखल असुन सर्व गुन्हे उघड करण्यात बीड पोलीसांना यश आले आहे. खुनाचा प्रयत्न करणे १९२ गुन्हे दाखल असुन १९२ गुन्हे उघड आहेत. तसेच दरोड्याचे २१ गुन्हे दाखल असून २१ गुन्हे उघड करण्यात पोलीसांना यश आले आहे. तसेच जबरी चोरीचे ७२ गुन्हे दाखल असुन ५१ गुन्हे उघडकीस आणले आहेत. बीड जिल्हयात १८५७ दारुच्या कारवाया केल्या असुन रुपये २,५६,६६,२६९/- चा मुद्देमाल जप्त केला आहे. तर जुगाराच्या एकुण ५२८ कारवाया करुन ४८,२४,२३६/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे बीड जिल्ह्यात छउझड च्या एकुण १६ कारवाया करुन १,२८,५९,५५१/- रुपयांचा गांजा जप्त करण्यात आला आहे. यावेळी सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना २०२४ च्या तुलनेत अधिक सक्रिय व भरीव काम करण्यासाठी सर्व गुन्ह्यांची निर्गती, डिटेक्शन, अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन, समन्स वारंट बजावणी, फरार व पाहीजे असलेले आरोपी यांचा शोध व आरोपी अटकेसाठी उद्दीष्ट ठरवुन देण्यात आले. तसेच कोणत्याही परीस्थीतीत अवैध धंदे चालु द्यायचे नाही अशा स्पष्ट सुचना मा. पोलीस महानिरीक्षक श्री. वीरेन्द्र मिश्र व पोलीस अधीक्षक श्री. नवनित काँवत यांनी सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना दिल्या.

मा. विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. वीरेन्द्र मिश्र यांनी जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधीकारी यांनी केलेले तपास, उपविभागीय पोलीस अधीकारी यांनी केलेल्या अवैध दारु, जुगार, अवैध वाळू उपसा व वाहतुक, अवैध



गुटखा यासंबंधाने आढावा घेतला. तसेच उपविभागीय पोलीस अधीकारी यांनी किती गावांना भेटी दिल्या. यासंबंधानो आढावा घेतला. त्याचप्रमाणे पोलीस ठाणे प्रभारी अधीकारी यांनी स्वतः किती गुन्ह्यांचा तपास केला. किती गुन्ह्यांच्या घटनास्थळाला भेटी दिल्या. पोलीस ठाण्यात दाखल होणाऱ्या किती गुन्ह्यात तपास अधीकारी यांना सुचना दिल्या. किती गावांना भेटी दिल्या. याबाबत आढावा घेतला. त्याचप्रमाणे पोलीस ठाणे स्तरावर प्रलंबीत असलेल्या तक्रार अर्जासंबंधाने आढावा घेण्यात आला. तसेच स्थानीक गुन्हे शाखा यांनी गुन्हे शोधसाठी केलेल्या कारवायांचा तसेच केलेल्या अवैध धंदयांवरील कारवाया व इतर कामकाजाबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. त्याचप्रमाणे जिल्हा विशेष शाखा यांचा आढावा घेतांना जिल्हा विशेष शाखेने निर्गती केलेले पारपत्र, चारीत्र्य पडताळणी व इतर कामकाजाचा आढावा घेण्यात आला. पोलीस स्टेशन व उपविभागीय पोलीस अधीकारी यांचे कार्यालयाचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी सविस्तर मार्गदर्शन केले. दाखल गुन्ह्यांची उकल करणे, गुन्ह्यांना आळा घालणे व कायदा व सुव्यवस्था आबाधीत राखणे हे आपले प्रमुख कर्तव्य असल्याचे विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी सांगीतले. तर पोलीस विभाग शीस्त प्रिय विभाग असल्याने आपल्याला 'खाकी' म्हणुन वेगळी ओळख आहे. त्यामुळे आपण कोणाच्याही दबावाला बळी न पडता निर्भीड व निष्पक्षपणे काम करावे. असा सकारात्मक विश्वास उपस्थीत अधीकारी यांचेत निर्माण केला.

त्याच प्रमाणे मागील महीन्यात उत्कृष्ट कामगीरी करणारे पोलीस ठाणे माजलगांव शहर, अंभोरा, पिंपळणेर, बीड शहर, पेठ बीड, अंबाजोगई शहर, युसुफ वडगांव, बीड ग्रामीण, स्थागुशा, आयटी सेल, मोटार परीवहन विभाग येथील अधिकारी व अंमलदार यांचा प्रशस्तीपत्र देवून सन्मान करण्यात आला. यापुढे प्रत्येक पोलीस स्टेशन व शाखेतील उल्लेखनीय कामगीरी करणारे अधिकारी अंमलदार यांचा प्रत्येक गुन्हे आढावा बैठकीत सन्मान करण्यात येणार असल्याचे पोलीस अधीक्षक यांनी सांगीतले.विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. वीरेन्द्र मिश्र यांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी राष्ट्रपती सन्मानचिन्ह प्राप्त झाल्याने त्यांचा बीड जिल्हा पोलीस दलातर्फे यथोचीत सत्कार करण्यात आला.विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. वीरेन्द्र मिश्र व पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी बीड जिल्ह्यात चालु असलेले सौर ऊर्जा प्रकल्प, पवन ऊर्जा प्रकल्पाचे अधिकारी यांची बैठक घेवुन त्यांच्या प्रकल्पाच्या अनुषंगाने मावेजासंबधाने तसेच जमीन अधिग्रहण संबधने महाराष्ट्र शासनाने काढलेल्या शासन निर्णया प्रमाणे कारवाई करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. तर विणाकारण अडवणुक करून खंडणी मागणाऱ्या इसमांविरुद्ध पोलीस स्टेशन येथे तक्रारी करण्याच्या सुचना प्रकाल्पाचे अधिकारी यांना देण्यात आल्या.

मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी राज्या प्रशासकीय यंत्रणेसाठी आखुन दिलेल्या ७ कलमी कार्यक्रमाचा आढावा मा. विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. वीरेन्द्र मिश्र यांनी आढावा घेतला.पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी चांगली कामगीरी करणाऱ्या अधिकारी व अंमलदारांचा सत्कार केल्याने अधिकारी

# चिंचोली येथे ३२ वा अखंड शिवनाम सप्ताह, श्री मन्मथ स्वामी जन्मोत्सोव कार्यक्रमाचे आयोजन

धर्माबाद (प्रतिनिधी)

धर्माबाद तालुक्यातील मन्मथधाम मठ संस्थान चिंचोली येथे ३२ वा अखंड शिवनाम सप्ताह परम रहस्य पारायण सोहळा श्री मन्मथ स्वामी जन्मोत्सव कार्यक्रम दर वर्षीप्रमाणे श्री राष्ट्रसंत सदगुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज वीरमत राजूर अहमदपुरकर यांच्या कृपा आशिर्वादाने व शिवैक्य श्री संत सोमशंकर नागनाथ स्वामी चिंचोलीकर यांच्या प्रेरणेने व श्री वेदमुर्ती बस्वराज सोमशंकर स्वामी महाराज चिंचोलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड शिवनाम सप्ताह व परमरहस्य पारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. दि. २९/०१/२०२५ ते ०२/०२/२०२५ पर्यंत अखंड शिवनाम सप्ताह कार्यक्रम गुरूवर्याच्या कृपाशिर्वादाने सपन्न होत आहे. टाळ आरती व तिर्थप्रसादाचा कार्यक्रम राहील. तरी सदभक्तांनी जिवन कृतार्त करुन घ्यावे हि नम्र विनंती.

सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम असे असतील,सकाळी ४ ते ६ शिवपाठ, ०७ ते ८ रुद्रभिषेक, ९ ते ११ परमरहस्य ग्रंथ पारायण सकाळी ११ ते १२ प्रसाद दुपारी १२ विश्रांती, दुपारी २ ते ४ मन्मथ गाथा भजन, दुपारी ४ ते ५ प्रवचन रात्री ठिक ९ ते ११ किर्तन व शिवजागर आहे.

किर्तनकार २९/१/२०२५ रोजी वार बुधवारी शि.भ.प.श्री. पुंडलिक महाराज संगमकर, ३०/१/२०२५ रोजी वार गुरूवार शि.भ.प.सौ. सुनिताताई दत्तात्रेय चांडोलकर, ३१/०१/२०२५ रोजी शुक्रवार रोजी शि.भ.प.कु. संध्याताई राजेश वेदले शिंगारवाडीकर, १/०२/२०२५ वार शनिवार रोजी शि.भ.प.अनिल महाराज शेवाळकर सर्व महाराजाच किर्तन आहे.रविवार रोजी परमरहस्य पारायण प्रमुख श्री. मारोती सायवु सज्जन जागर भजनी मंडळी संगम व वेलुर (खु) पुरुष/महीला भजनी मंडळ शिंगारवाड व चिंचोली पुरुष/महीला भजनी मंडळ येताळा व बिद्राळी पुरूष/महीला भजनी मंडळ माळसावरगाव व जारिकोट व पाटोदा पुरूष/महीला भ.नं.प्रसादा वरील किर्तन शि.भ.प.श्री. मोहनराव कावडे गुरुजी हसनाळीकर प्रसाद दाते- दुपारचे प्रसाददाते दि. २९/०१/२०२५ वार बुधवार रोजी श्री. पिराजी भुमन्ना पा. काळे,दि.३०/०१/२०२५ वार गुरूवार रोजी श्री. मारोती तिप्पाजी पा. काळे,दि.३१/०१/२०२५ वार शुक्रवार रोजी श्री. राजेश्वर गंगाराम पा. कोदळे,दि.०१/०२/२०२५ वार शनिवार रोजी श्री. मारोती सायबु सजन या सर्व मान्यवरांचा प्रसाद आहे.संध्याकाळचे प्रसाददाते दि.२९/१/२०२५ वार बुधवार रोजी श्री. सुभाष लक्ष्मण पा. काळे, दि.३०/१/२०२५ वार रोजी गंगाराम भुजंगराव पा. कोदळे,३१/०१/२०२५ वार शुक्रवार रोजी विठ्ठल नारायण पा. अटकाळे,१/२/२०२५ वार शनिवार रोजी श्री. रमेश प्रभू पा. काळे, दि.२/२/२०२५/वार रविवार रोजी महाप्रसाद समस्त गावकरी मंडळी, चिंचोली यांच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे.भजनी मंडळ महीला / पुरुष। वसुंधरारत्न महिला भजनी मंडळ व आनंदाबाई महिला भजनी जारिकोट, शिवमहिमा भजनी मंडळ बाळापुर, बिद्राळी, जारिकोट,

पाटोदा (बु), संगम, बामणी (थडी), घोडापुर, टाकळी, सिद्धापुर, जुत्री, आरळी, बत्राळी, बेल्लूर (खु) नायंगाव (घ), हंगरगा, चिंचोली, माबंदी (बु), मायंदी (खु), गायक वादक दिगांबर पा. मोकली, गणेश पा. जुन्नी, विरभद्र पा. जुन्नी, , बाबु महाराज टाकळीकर, सुरेश पा. जुन्नी, अनिल पा. घोडापूर, मारोती पा. चिंचोली,शेषेराव पा. मोकली, साईनाथ सजन चिंचोली, ओमप्रकाश पा. सिध्दापुर, शंकर महाराज हंगरगा, साईनाथ हंगरगा, संभाजी पा. जुनी, प्रकाश पा. आरळी, शिवकुमार पा. चिंचोली, मारोती पा. राजापूर, नागनाथ पा. आरळी, संजय दृहले आरळी, संतोष पा. घोडापुर, अशोक पा. माबंदी, कल्बाई जारिकोट, चोंडी भजनी मंडळी, बिद्राळी भजनी मंडळी, माधव पा. ममदापुर, लोकेश पा. जवळा, संतोष महाराज इळेगाव, साईनाथ शिंदे हुंडा, सनतकुमार मोकली,

मन्मथ पा. विळेगाव, दिडी प्रमुख गंगयाप्पा स्वामी माबंदी, माधवराव सोमाचे पाटोदा, श्री. हानमल्लु पुजरवाड पदयात्रेचे गावे बोधन मंडळ, मावंदी (बु), मावंदी (खु), साठापुर, हंगरगा, पाटोद (बु), बिद्राळी, बजाळी, जारीकोट, रत्नाळी, चिरली, जुनी, कुंभरगाव दिः ०१/०२/२०२५ रोज शनिवार संध्याकाळी मन्मथधाम मठामध्ये दिंडीचे आगमन होणार आहे.विनित समस्त गावकरी मंडळी, मोजे चिंचोली संपर्क वेदमुर्ती बस्वराज स्वामी ७७७५८३७६०८ दि. ०१/०२/२०२५ सायंकाळी ०७:०० वाजता दीपउत्सव आयोजित करण्यात आले आहे.तरी सर्व कार्यक्रमाचे आयोजन समस्त गावकरी मंडळी चिंचोली यांच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे.तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आव्हान ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.



# सावरकरच्या पुस्तक परीक्षण स्पर्धेत विद्यार्थिनींची बाजी

बीड (प्रतिनिधी)

येथील स्वा. सावरकर महाविद्यालयाच्या ग्रंथालया मार्फत वाचन संकल्प महाराष्ट्राचा २०२५ विविध उपक्रमानी साजरा झाला. विद्यार्थ्यांच्या वाचन सवयी वृद्धिंगत होण्यात या पंधरवड्याचे मोठे योगदान राहिले. या अंतर्गत ' पुस्तक परीक्षण स्पर्धा ' घेण्यात आली, स्पर्धेस विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. या स्पर्धेचे परिक्षण स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालय च्या माजी पर्यवेक्षिका श्रीमती अंजली कुलकर्णी यांनी केले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक - नंदिनी नंदकुमार रुईकर, कला प्रथम वर्ष, व्दितीय क्रमांक - श्रद्धा श्रीकांत ठोसर, कला, तृतीय वर्ष, तृतीय क्रमांक - संध्या देविदास बेहरे, कला, प्रथम वर्ष उत्तेजनार्थ - सिया योगेश बुंदेले, विज्ञान, प्रथम वर्ष आणि दिशा प्रवीणकुमार बांगर, विज्ञान, व्दितीय वर्ष यांनी पारितोषिक मिळवले. सर्व बक्षिसपात्र वाचकांना २६ जानेवारी रोजी ध्वजवंदना नंतर भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य ड. रोहित सर्वज्ञ, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष प्रा. चंद्रकांत मुळे, प्राचार्य. डॉ. सुहास मोराळे व दोन्ही उपप्राचार्य डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हानकर व डॉ.उत्तम साळवे मान्यवरांच्या हस्ते पुस्तकांचा संच आणि प्रमाणपत्र बक्षीस स्वरूपात दिले गेले. सर्व सहभागिना प्रमाणपत्र देवून प्रोत्साहित करण्यात आले.या प्रसंगी दिशा प्रवीणकुमार बांगर, विज्ञान, व्दितीय वर्ष हिने गौरव भित्तीपत्रकाच्या स्वरूपात आपले पुस्तक परीक्षण प्रकाशित केले. ग्रंथपाल डॉ. अनुजा कास्तीकर यांनी या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केले. सचिन चौरे, बाळासाहेब वाघमारे यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला.

# पुरवठा विभागाने हमालांच्या हक्काच्या मजूरी पासून वंचित करणे बेकायदेशीर

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुका पुरवठा विभागाने गेले वीस वर्षापासून कार्यरत हमालांना हक्काच्या मजूरी पासून वंचित करणे बेकायदेशीर याबाबत माथाडी बोर्डाने कार्यवाही करावी व हमालांना पुर्ववत कामास घ्यावे या मागणीसाठी माथाडी बोर्डासमोर संघटनेचे सरचिटणीस रामभाऊ बादाडे यांचे नेतृत्वाखाली बीड गोदाम हमालांनी धरणे आंदोलन केले.




याबाबत कामगारांच्या वतीने संघटनेने निवेदन माथाडी मंडळाकडे दिले. त्याच्या प्रती जिल्हा पुरवठा अधिकारी तसेच महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाचे उपाध्यक्ष राजकुमार घायाळ यांना दिले तसेच माथाडी बोर्डाने अश्या पद्धतीने कामावरुन कमी करणे बेकायदेशीर असल्याची बाब जिल्हा पुरवठा अधिकारी यांना लेखी कळवूनही त्याची दखल अद्याप घेतली नसल्याने माथाडी मंडळाने कार्यवाही करावी अशी मागणी संघटनेने केली.

# समाजाला संत गाडगेबाबा यांच्या विचारांची गरज - डॉ.कैलास वायभासे

आष्टी (प्रतिनिधी)


आजचे युग हे विज्ञान व तंत्रज्ञानाचे आहे. विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या पाठीमागे न लागता अभ्यास करावा. मोबाईल हे जेवढे फायद्याचे आहेत तेवढे त्याच्यापासून तोटे ही आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मोबाईलचा योग्य वापर करावा. विद्यार्थी हा देशाचा भावी आधारस्तंभ आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी आज नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करून उच्च अधिकारी बनावे व आपल्या आई - वडिलांचे नाव उज्वल करावे. आजच्या समाजाला समाज सुधारक संत गाडगेबाबा यांच्या विचारांची गरज आहे असे प्रतिपादन सोमवारी (ता. २७) अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. कैलास वायभासे यांनी केले. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर व कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धानोरा यांचे संयुक्त विद्यमाने चिंचोली (ता. आष्टी) येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भास्कर धलावडे, बबन दहातोंडे, किशोर अंधारे, शरद जाधव, शेख मुनीर फौजी, सुधीर




ठाणगे, दिनेश जाधव, श्रीमती थोरवे, हौसराव भालेराव, हरिश्चंद्र गाडे, माजी सरपंच महादेव इथापे आदी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना मतदार दिनानिमित्त शपथ देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. उस्मान खान पठाण यांनी केले. या कार्यक्रमाला प्रा. निसार शेख, डॉ. रमेश खिळदकर, प्रा. विवेक महाजन, प्रा. आजिनाथ गिलचे, प्रा. राजेंद्र मिसाळ, प्रा. आतेश बनसोडे, प्रा. ज्ञानेश्वर अम्रीत, प्रा. डॉ. बोराडे बाळू, प्रा. राजू शेलार, प्रा. शबाना शेख, प्रा. रत्नमाला तरटे, प्रा. सुभाष मोरे, प्रा. ज्ञानदेव बोडखे, प्रा. गोरक्षनाथ वाळके, प्रा. सतीश तागड यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. संजय झांजे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. गहिनीनाथ एकशिंगे यांनी मानले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गंगाई - बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार जाहीर

## डॉ. सोपानराव निंबोरे, निसार शेख, शरद तळेकर, ज्ञानेश्वर राऊत आदींचा समावेश



आष्टी (संस्कार लाड)

आष्टी मतदार संघाचे माजी आमदार तथा शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष भीमराव धोंडे यांचे माता - पिता यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित या वर्षीच्या (एकविसावा) गंगाई बाबाजी महोत्सव २०२५ मधील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना देण्यात येणाऱ्या 'गंगाई - बाबाजी आदर्श पुरस्कारांची' घोषणा नुकतीच करण्यात आल्याची माहिती या महोत्सवाचे संकल्पक माजी आमदार भीमराव धोंडे तसेच संयोजन समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनी दिली.

आष्टी येथील भगवान महाविद्यालयाद्वारा आयोजित हा महोत्सव ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२५ या कालावधीमध्ये संपन्न होत आहे. गुरुवार दि ३० जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता माजी मंत्री सुरेश नवले यांच्या प्रमुख उपस्थितीत व माजी आ. भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन सोहळा संपन्न होणार आहे. उद्घाटनानंतर याच दिवशी महाविद्यालयीन वक्तृत्व व काव्यवाचन स्पर्धा घेण्यात येतील. शुक्रवार दि. ३१ जानेवारी रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित केलेले आहे. शनिवार दि १ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता गंगाई - बाबाजी आदर्श पुरस्कार विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, प्रसिद्ध सिनेअभिनेत्री कल्याणी चौधरी, मा. आ. भीमरावजी धोंडे, युवा नेते अजय धोंडे यांच्या उपस्थितीत दिला जाणार आहे. तर दुपारी ४ वाजता खुल्या लावणी नृत्य स्पर्धा होणार आहेत. तरी वरील कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, उपप्राचार्य डॉ. ज्ञानदेव वैद्य, उपप्राचार्य डॉ. आप्पासाहेब टाळके, उपप्राचार्य सुनील भवर, डॉ. बाळासाहेब गावडे, डॉ. आबासाहेब पोकळे, डॉ. वंदना घोडके व संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

पुरस्काराचे मानकरी धार्मिक क्षेत्र - ह. भ. प. पांडुरंग जाधव गुरुजी, अशोक देवा जोशी. सामाजिक क्षेत्र - संजय भास्करराव सानप, डॉ. महेश गोलेकर, श्रीमती लता उत्तम शिंदे, सोनाली संजय बोऱ्हाडे. कृषी क्षेत्र - अशोक मारुतीराव गुट्टे, हनुमंतराव गावडे. साहित्य क्षेत्र - प्रोफेसर सुधाकर शेलार. पत्रकारिता क्षेत्र - शेख निसार हाफीजोद्दीन ( दै.सकाळ ,आष्टी ), विजयकुमार गाडेकर ( शिरूर लोकमत ), हमीद खान पठाण, शरद तळेकर, अशोक भांडेकर. शिक्षण क्षेत्र - प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे, डॉक्टर बापू खैरे, उत्तम पवार, शहादेव मुळे, श्रीमती शबनम मुबारक काझी, श्रीमती प्रतीक्षा राजेंद्र मेश्राम, डॉ. संजय माणिकराव धोंडे, अशोक डोके, ज्ञानेश्वर राऊत. आदर्श उद्योजक - अशोक शेठ भंडारी, हनुमंत जीवे, पांडुरंग सोनवणे. आदर्श तलाठी - श्रीमती मंगल बाबुराव सानप, आदर्श ग्रामसेवक - श्रीमती निशा रावसाहेब आदक, श्रीमती वर्षा भोपळे, कलाक्षेत्र - कुमारी वैभवी टाकणकर, क्रीडा क्षेत्र - सोनबा गोगाणे कुस्ती, कुमारी शेख भूषरा नुर हे आहेत.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )



# दिवसाढवळ्या चोरट्यांनी घर फोडून एक लाख रुपयावर मारला डल्ला

पाटोदा (प्रतिनिधी)

पाटोदा येथील शिक्षक कॉलनीत राहत असलेले सेवानिवृत्त गटविकास अधिकारी श्रीराम टेकाळे यांचं घरावर पळत ठेवून दिवसाढवळ्या अज्ञात चोरट्यांनी घर फोडून जवळपास एक लाख रुपयांचा डाग दागिने लंपास केले. पाटोदा येथील शिक्षक कॉलनीत सेवा निवृत्त गटविकास अधिकारी श्रीराम टेकाळेव त्यांच्या पत्नी शिक्षिका संध्या टेकाळे हे राहतात. मंगळवारी येवलवाडी येथील

जवळचे पाहुणे मृत झाल्याने त्यांचा सावरण्यासाठी दोघे पती-पत्नी येवलवाडी येथे गेले होते कार्यक्रम झाल्यानंतर हे दोन्ही पती पत्नी गावाकडे निघाले होते शिक्षिका संध्या टेकाळे त्यांच्या स्कुटीवर त्यांची जावा बरोबर निघाल्या जवळपास सकाळी साडेदहा वाजता त्या आपल्या घरी पोहोचल्या त्यावेळेस त्यांना आपल्या घराजवळ एक इसम उभा असल्याचे दिसून आले. त्या इसमाने आपल्या तोंडावर काळा रुमाल बांधला होता त्यांना वाटले आनलाईवाला असेल नंतर टेकाळे सर आपल्या आधी आले कि काय मात्र थोड्याच वेळात दोन अज्ञात काळा रुमाल लावलेले इसम बाहेर येताना दिसतात सध्या टेकड्यांना हे चोरटे असल्याचे त्यांनी ओळखले. संध्या टेकाळे यांनी बाहेर उभे असलेल्या चोरट्याच्या पायाला मिठी मारली आतून आलेल्या दोघांपैकी एकाने शिक्षिकेवर कोयता उभारल्याने टेकाळे यांनी चोरट्याचे पाय सोडून दिले आरडा ओरड झाल्याने चोरटे पसार झाले चोरट्यांनी घरातील कपाट फोडून २५०० रुपये नगदी व तसेच सोने-चांदीचे दागिने असा एकूण एक लाख रुपयाचा ऐवज लंपास केला. दरम्यान टेकाळे यांनी पाटोदा पोलीस स्टेशन येथे संबंधित चोरी घटनेची फिर्यात नोंदवली. टेकाळे कुटुंब हे सधन कुटुंब आहे. टेकाळे यांचा मुलगा मानसोपचार तज्ञ असून मुलगी पण आष्टी येथे वैद्यकीय अधिकारी पदावर काम करत आहे चोरट्यांनी पाळत ठेवून घर फोडले असावे असा अंदाज वर्तवला जात आहे. पाटोदा पोलीस चोरट्याचा तपास करीत आहे.

# माऊली विद्यापीठाच्या विवीध संकुलामध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

केज/प्रतिनिधी

माऊली विद्यापीठ केज संचलित सरस्वती महा विद्यालय,भाऊसाहेब पाटील अध्यापक विद्यालय,महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. ७६ व्या भारतीय प्रजासत्ताकदिनी माऊलीविद्यापीठसंस्थेच्या सदस्या सौ.देविकाताई पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करून तिरंगा ध्वजास मानवंदनादेण्यात आली.सरस्वती महा विद्यालयकेज,भाऊसाहेब पाटील अध्यापक महा विद्यालय व भाऊसाहेब पाटील अध्यापक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी माऊली विद्यापीठ केजचे सचिव अजित्य दादा पाटील, अड.अमितभैया पाटील, सौ.अनन्या पाटील, प्रवीणकुमार शेप, प्रशासकीय अधिकारी प्रताप मोरे,विश्वजित पाटील,मनोज पाटील, प्राचार्य डॉ.गौतम पाटील, विजयकुमार शिनगारे, डॉ.हनुमंत सौदागर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.



# संविधानातील सर्वसमावेशकता हीच भारताची खरी ताकद- मा. सुरेश सावंत

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

भारतीय संविधानातील सर्वसमावेशकता हीच भारताची खरी ताकद आहे असे प्रतिपादन राजकीय विचारवंत सुरेश सावंत (मुंबई) यांनी केले. योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या महात्मा गांधी अध्ययन केंद्राच्या वतीने आयोजित जागर लोकशाहीचा आपणा सर्वांचा या कार्यक्रमात सुरेश सावंत यांनी भारतीय राज्यघटना ईतर देशांच्या घटने पेक्षा वैशिष्ट्यपूर्ण व वेगळी कशी आहे हे सांगितले .हे जनतेने केलेल संविधान होय. राजेशाही संपून लोकशाही व्यवस्था स्विकारली. जनसामान्यांचा सहभाग वाढला स्वातंत्र्य समता बंधुता ही मूल्ये संविधानात स्विकारली गेली . भारतीय संविधानाने महिलांना मतदानाचा अधिकार दिला व स्त्री पुरुष समानता आणली. हा देश सगळ्यांचा आहे ही महात्मा गांधीची भूमिका होती याचे प्रतिबिंब भारतीय घटनेत दिसून येते असे मत सुरेश सावंत यांनी व्यक्त केले. बंधुता ही बाबासाहेबांची संविधानाला दिलेली देणगी आहे खुप चर्चेअंती संविधान लागु केले गेले संविधानाने भारतीयांच्या प्रगतीचा मार्ग प्रशस्त केला असे मत सुरेश सावंत यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांच्या संबोधनाने झाला.भारतीय संविधान लहान वयातच मुलांना कळायला हवे, तरच संविधानाची मूल्ये जोपासली जातील असे प्रतिपादन अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी केले . सातत्याने संविधानाविषयी माहिती सांगितली गेली तर तरुण पिढी संविधाननिष्ठ निर्माण होईल असे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जागर लोकशाहीचा कार्यक्रमाच्या संयोजिका डॉ शैलजा बरुरे यांनी केले. संविधानातील मूल्यव्यवस्था समजून घेण्या पाठिमागची भूमिका विशद केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सविता बुरांडे यांनी केले तर आभार प्रदर्शन नाट्यशास्त्र विभागातील डॉ . ज्ञानेश्वर सोनवणे यांनी केले. या कार्यक्रमाला योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर, सहसचिव प्रा. एन. के. गोळेगावकर,प्रा. माणिकराव लोमटे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. थारकर, मेजर एस. पी. कुलकर्णी, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते .



# जळगांव शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

आष्टी (प्रतिनिधी)

**जि. प. प्रा. शा. जळगाव शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन व विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे उद्घाटन जळगावचे सरपंच पोपट गोंड यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मच्छिंद्र शेंडे, केंद्रीय मुख्याध्यापक पाचारणे, शिक्षकप्रेमी डी. एस. राऊत व काशिनाथ गदादे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.**

वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक संदीप औटे यांनी केले. त्यांनी यावेळी स्नेहसंमेलन कार्यक्रमाची रूपरेषा मांडली तर सहशिक्षक अमोल कदम यांनी शाळेने वर्षभर राबवलेल्या शैक्षणिक उपक्रमांची रुपेरेषा मांडली. शालेय स्थापनेपासूनच्या इतिहासामध्ये प्रथमच जि. प्रा. शा. जळगाव शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन प्रथमच संपन्न झाला. या प्रशालेच्या १ ली ते ४ च्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमांमध्ये सोशल मीडियाचा अतिवापर व त्याचे दुष्परिणाम, गीत, शुरमर्दानी लाठीकाठी पर्यंतच्या सर्व कला गुणांना या कार्यक्रमांमध्ये स्थान देण्यात आले होते. स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्कृष्टरीत्या सादर केल्याबद्दल मान्यवरांनी सर्वांचे कौतुक केले. सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन सहशिक्षक अमोल कदम यांनी केले. यावेळी पंचक्रोशीतील ग्रामस्थ, पालक व शिक्षकप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# स्वामी विवेकानंद विद्या मंदिर केजचे वार्षिक स्नेह संमेलन उत्साहात

## विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने प्रेक्षकांची मने जिंकली,सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थी कलाकार घडतात-डॉ. हनुमंत सौदागर

केज/प्रतिनिधी

केज शहरातील नामांकित शाळा स्वामी विवेकानंद विद्या मंदिर (प्राथमिक) चे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून केज गटसाधन केंद्राचे जेष्ठशिक्षणविस्तार अधिकारी दत्तात्रय चाटे, प्रमुख पाहुणे डॉ.हनुमंत सौदागर उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रमुख पाहुणे डॉ.हनुमंत सौदागर म्हणाले मराठवाडा ही कलाकारांची भूमी आहे स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो यामधून चांगले कलाकार घडतात असे मत व्यक्त केले.

श्री.दत्ताञय चाटे म्हणाले की,बाल कलाकारांना पालक चांगला प्रतिसाद देऊन सहकार्य करतात असे मत व्यक्त केले.प्रमुख उपस्थिती जीवन विकास शिक्षण मंडळ केजचे अध्यक्ष श्री. अंकुशराव इंगळे, फजिलोद्दीन काझी, नारायण अंधारे,शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शैलाताई इंगळे, श्रीमती मुळे,गणेश कोकीळ यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजपोवाडा, मराठी,हिंदी,लोकगीत, गोंधळ,भारुड अशा विविध गीतावर नृत्य सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.कार्यक्रमाचे नियोजन शाळेचे मुख्याध्यापक श्री.शितोळे, सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री.मंगरूळकर सर यांच्या मार्गदर्शनात झाले. सूत्रसंचलन श्री.एम.गिरी यांनी केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.



# मराठायोद्धा मनोज जरांगे पाटीलयांच्या आंदोलनाची शासनाने दखल घ्यावी

## धारूर तालुक्यातील सकल मराठा समाजाची मागणी

किल्लेधारूर/प्रतिनिधी

मराठा समाजालाओबीसी मधून आरक्षण द्यावे म्हणुन मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील हे विविध मागण्यांसाठी आमरण उपोषण करत आहेत मनोज जरांगे यांच्या आमरण उपोषणाच्या समर्थनार्थ धारूर तालुक्यातील सकल मराठा समाजाने प्रशासनाकडे निवेदन दिले आहे.गेल्या पाच दिवसांपासून जरांगे पाटील अंतरवाली सराटीत उपोषणास बसले आहेत.ज्यांचे उपोषण सामजिक आणि आरक्षणाच्या मुद्द्यांवर केंद्रित आहे.याउपोषणास पाठिंबा देण्यासाठी धारूर तालुक्यातील गरजवंत मराठा समाज एकत्रित आला आहे.सकल मराठा समाजाच्या वतीने धारुर तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.सदर निवेदनात महत्त्वाच्या अनेक मागण्या करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्रातील मराठा समाजास सरसकट कुणबी प्रमाणपत्र देणे,हैदराबाद व सातारा संस्थान गॅझेटिअरची तात्काळ अंमलबजावणी करणे,न्यायमूर्ती शिंदे समितीने कुणबी नोंदी शोधण्यासाठी समितीला एक वर्ष मुदतवाढ द्यावी,सगे-सोयरे अधिसूचनेचे तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी,मराठा समाजासाठी एथड आरक्षण रद्द केलेले एथड पुन्हा सुरू करण्यात यावे,मराठा समाजावर दाखल केलेले खोटे गुन्हे मागे घेण्यात यावे,महाराष्ट्रातील मराठा समाज हा कुणबी आणि मराठा एकच आहे म्हणून महाराष्ट्रातील मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे यासहअनेकमागण्या करण्यात आल्या आहेत.मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणावर प्रशासनाने तात्काळ विचार न केल्यास,धारूर सकल मराठा समाज शक्तिशाली आंदोलन करण्याची तयारी करत आहे.दि.३१ जानेवारी २०२५ पासून मोर्चे, तहसील कार्यालया समोर धरणे आणि इतर संविधानिक पद्धतींचा वापर करून तीव्र आंदोलन सुरू करण्यात येणार आहे,या मराठा आरक्षण आंदोलनात धारूर तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.





# केज तालुका सकल मराठा समाजाचा आज श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात रास्तारोको

केज/प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील त्यांच्या उपोषणाचा आज सहावा दिवस आहे.त्यांची व त्यांच्यासोबत उपोषण करणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांची प्रकृती खालावली आहे.मात्र शासनाने त्यांच्या उपोषणाची अद्याप दखल घेतलेली नाही.त्यांचे आंदोलन हे सकळ मराठा समाजाच्या समस्या सोडवण्यासाठीअसल्याने समाजाने त्यांची काळजी घेणे गरजेचे आहे.सद्य स्थितीत त्यांच्या जीवाला कधीही धोका होऊ शकतो.शासनाने त्यांच्या उपोषणाची दखल घेऊन तात्काळ चर्चा करावी या साठी केज तालुका सकल मराठा-बहुजनसमाजाच्या वतीने गुरुवार दि.३० जानेवारी रोजी सकाळी दहा वाजता केजच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात रास्तारोको आंदोलन करण्यात येत आहे.लोकशाही मार्गाने अत्यंत शांततेत हे आंदोलन केले जाणार आहे.तरी तालुक्यातील जास्तीत जास्त समाज बांधवांनी या आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन सकल मराठा -बहुजन समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

# ब्रह्मकुमारी ईश्वरीय परिवाराने दिले सन्मानाचे आनंदाचे वाण

संक्रांत सणाचे औचित्य साधून ब्रह्मकुमारी ईश्वरीय विद्यालय माजलगाव च्या संचालिका अनिता दीदी शीला दीदी, सारिका ताई यांनी हळदी कुंकू व स्नेह मिलन कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमांमध्ये सौभाग्यवती स्त्रियांबरोबर एकल महिला ज्यांच्या पतीचे निधन झाले आहे अशा महिलांना बोलावून त्यांना हळदीकुंकू तिळगुळ देऊन सुख-समृद्धीचे वाण दिले.

याप्रसंगी बोलताना अनिता दीदी म्हणाल्या आनंद, सुख, शांतता ईश्वरीय गुण आहेत. माणूसच असा प्राणी आहे जो इतरांचं सुखदुःख जाणू शकतो ते दूर करण्याचा प्रयत्न करू शकतो. आपल्या उत्साहात आनंदात इतरांना सामील करून घेतल्याने आपला आनंद वाढत असतो. आज इथे आलेल्या एकल महिला यांचे दुःख आपण समजून घेऊन आपल्या आनंद मध्ये त्यांना सामील करून घेऊया. प्रत्येकाच्या जीवनात अनंत दुःख यातना येतात त्याला सामोरे जाण्याची बळ ईश्वर आपल्याला देवो. वान देणे याचाच अर्थ जिथे ज्याची वाण आहे कमी आहे तिथे ते दिले पाहिजे.आपण या माता-भगिनींना आनंदाचे सन्मानाचे वाण देऊन त्यांचे जीवन सुखी समृद्ध करू या. सारिका बेद्रे या प्रसंगी म्हनाल्या आनंद वाटणाऱ्या ओंजळी कधी रिकाम्या होत नसतात. आपण सावित्री आणि जिजाऊंच्या वारसदार आहोत अनिष्ट रूढी परंपरा यांना आपण विरोध केला पाहिजे. एक माणूस म्हणून स्त्रीला तिचे प्रत्येक हक्क आपण द्यायलाच पाहिजेत. सण उत्सव समारंभात या स्त्रियांना सन्मानाने वावरता आलं पाहिजे यासाठी एक पाऊल पुढे होऊन त्यांना प्रवाहात सामील करून घेऊयात.



प्राध्यापिका संगीता जाधव यांनी याप्रसंगी आपले विचार व्यक्त केले. मागील दहा वर्षापासून या महिलांना प्रवाहात आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत खऱ्या अर्थाने आज त्याला यश मिळत आहे. या अनिष्ट रूढी परंपरांना छेद देऊन आम्हाला माझ्या येणाऱ्या माता-भगिनींसाठी पुढे यावच लागेल. आज आधुनिक काळातही महिलांचे विचार विधवा महिलांविषयी प्रगल्भ दिसून येत नाहीत. तिच्या आयुष्याची खेळण्याचा अधिकार आपल्याला कोणी दिला? संविधानाप्रमाणे आपण सर्व एक समान आहोत. आज या ठिकाणी खऱ्या अर्थाने सावित्रीच्या लेकीने ऐतिहासिक पाऊल टाकले आहे त्याचा आम्हाला अभिमान आहे.डॉ मानसी देशमुख यांनीही आपले विचार व्यक्त केले एकल स्त्रियांना समाजामध्ये सन्मानानच स्थान मिळवून देन्यासाठी आपण सर्व महिलांनी मिळून प्रयत्न केले पाहिजेत.तिला दया दाखवण्याची नाहीतर सन्मान देण्याची गरज आहे.विजयमाला भारती म्हनाल्या विधवा महिलांनी आपला मान सन्मान मिळवण्यासाठी स्वतः पुढं आलं पाहिजे.जोडवी, बागड्या, हळदी कुंकू लावत पाहिजे. आपण मुलांचं भाग्य बनवणाऱ्या सोभाग्यवतीच आहोत.लता टाक यांनी या महिलांची खणा नारळाने ओटी भरून त्यांचा मानसन्मान केला. आनंदाच्या उत्साहाच्या या मंगल प्रसंगी त्यांच्या जीवनात खऱ्या अर्थाने आनंदाचं दान दिलंया कार्यक्रमासाठी जान्हवी जाधव, विजयमाला भारती, सुनीता टाक, सागर होके ,मंगल कोल्हे गिल्डा भाभी ,लता बन ,उर्मिला सादोळकरकर, हराळे मॅडम

# डॉक्टर, इंजिनिअर बनण्याआधी चांगला माणूस बना ! - डॉ. श्रीहरी बुडगेमवार

मुखेड /प्रतिनिधी

मुखेड - चिमुकले विद्यार्थी हे या देशाचे उद्याचे भावी नागरिक आहेत. जिजाऊ ज्ञानमंदिर ही शाळा व या शाळेचे संचालक ज्ञानोबा जोगदंड सर आपल्या जिजाऊ परिवाराच्या माध्यमातून तज्ञ व अनुभवी शिक्षकांच्या प्रामाणिक प्रयत्नातून विद्यार्थ्यांना क्वालिटी शिक्षण देतात. मुलांनो ! चांगला अभ्यास करा. गुरुजनांचा आदर करा. चांगले शिक्षण घेऊन आपल्या क्षेत्रात चांगला नावलौकिक मिळवा. डॉक्टर , इंजिनिअर , अधिकारी , आमदार, खासदार, होण्याआधी चांगला माणूस बना ! असे प्रतिपादन एम.डी. रेडिओलाजिस्ट डॉ. श्रीहरी बुडगेमवार यांनी २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित बक्षिस वितरण कार्यक्रमात केले. दि. २१ ते २५ जानेवारी दरम्यान जिजाऊ क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन शाळेत करण्यात आले होते. या विविध स्पर्धेतील विजेत्या स्पर्धक विद्यार्थ्यांना व संघाला २६ ते २७ जानेवारी रोजी प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थितीत योग्य बक्षिस देऊन सन्मानित करण्यात आले. त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.सलग चार दिवस आयोजित केलेल्या विविध स्पर्धांची व स्पर्धक विद्यार्थ्यांची संख्या मोठी असल्याने सदरील बक्षिस वितरण दोन दिवसांच्या कार्यक्रमात घ्यावे लागले. विविध क्रिडास्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धानंतर बक्षिस वितरण कार्यक्रमात देशभक्तीपर गीते, नृत्यस्पर्धा , बालनाटिका , लावण्या , लोकगीते 'फॅशन शो ' देशभक्त व घोषवाक्य वाचन ' आदी विविध गुणदर्शन कार्यक्रम दोन दिवस घ्यावा लागला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक ज्ञानोबा जोगदंड सर तर प्रमुख उपस्थितीत मुख्याध्यापक जगदीप जोगदंड सर तसेच अतिथी म्हणून पंचायत समिती मुखेडचे शिक्षण विस्तार अधिकारी बाळासाहेब कदम सर , केंद्रप्रमुख शेळके सर , ज्येष्ठ सेवानिवृत शिक्षक साधू मुळके सर , सुप्रसिद्ध युवा सराफा व्यापारी पवन पोतदार , ज्येष्ठ पत्रकार शिवाजी कोनापूरे सर तर दुसऱ्या सत्रात एम.डी. रेडिओलॉजिस्ट डॉ. श्रीहरी बुडगेमवार , पत्रकार शिवकुमार बिरादार , प्रा. मिलींद गायकवाड सर , तर तिसऱ्या सत्रात राजे छत्रपती अकॅडमीचे संचालक ज्ञानेश्वर डुमणे पाटील , कृषी अधिकारी दिगांबर शेटवाड सर, पालक प्रतिनिधी म्हणून मैनोदीन शेख , चंद्रकांत गोंदलवाड सर , सौ. जायमहेत्रे ताई , देवराज पाटील मसलगेकर सर , चंद्रकांत जाधव सर भानुदास पाटील इंगोले , बालाजी इंगोले , विलासराव जुन्ने पाटील ,दिगांबर पा. इंगोले आदी मान्यवरांची उपस्थिती होती. आपापल्या वर्गशिक्षिक व शिक्षिका यांच्या मार्गदर्शनाखाली नर्सरी ते पहिली पर्यंतच्या बहुसंख्य विद्यार्थ्यांनी फॅशन शो अर्थात फॅन्सी ड्रेस स्पर्धे




मध्ये सहभाग नोंदवला होता. युकेजी च्या प्रियांशी , मिताली , शुभ्रा , शरयू . , आहाना शेख , मानसी भद्रे , प्रज्वल , श्रीपाद इंगोले , आर्यन चौधरी , कुणाल शेखावत आदी चिमुकले विद्यार्थी समुहनृत्यात सहभागी झाले होते. अधिराज मस्कले नागरधारी शेतकरी , अभिनंदन गंगावणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर बनला होता. अशीच अनेक मुले विविध नेताजींच्या वेशभूषेत सहभागी झाली होती. इयता पहिली च्या कनिष्का , राजनंदिनी, आदिनाथ या विद्यार्थ्यांनी समूहनृत्य तर गणेश, आयुश , संगीता या विद्यार्थ्यांनी गीत आणि साईनाथने अभिनय सादर केला. 'कर चले हम फिदा ' ... या देशभक्तीपर गाण्यावर इयता दुसरीच्या रुद्र पेड या मुलांने भावस्पर्शी नृत्य सादरीकरण करून रडायला भाग पाडले. समर्थ बंडे, समृद्धी, आणि संचानी सुंदर अशी नाटिका सादर केली. गोविंदराज गोपनर आणि संच यांनी नृत्य सादरीकरण केले. इयता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी 'संदेशे आते है ' या गाण्यावर चैताली गोंदलवाड , पूनम चव्हाण , सुविज्ञा मुखेडकर , श्रेया श्रीमंगले ' श्रेया भालेराव , मोहिनी आगलावे आदी मुलींनी सुंदर नृत्य सादर केले. जिस देश मे गंगा रहता है या गाण्यावर अनाया चौधरी , आलिशा शेख , संस्कृती माकणे , आर्या श्रीरामे , फीर भी दिल है हिंदुस्थानी या गीतावर विहान चव्हाण, शुभम चव्हाण , कृष्णकांत जुन्ने, चैतन्य शिंदे , संगेवार विराज , मयुर गोंड , शौर्य गुट्टे , रितेश जमदाडे ' द्रोण गव्हाणे, विराट माकणे आदी विद्यार्थ्यांनी चांगल्याच टाळ्या मिळविल्या. सौ सुरेखा राठोड मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली 'ललरश्र चशवळर ' हे मोबाईलचे दुष्परिणाम दर्शविणारे , विद्यार्थ्यांच्या व मानवी मन , मेंदूवर आक्रमण करणारे घटक याचे भयानक वास्तव या नाटिकेतून सादर केले. त्यात सुमित राठोड, आरुष धनवाडे, संभाजी भोसले, गणेश आचेवाड, आकाश चव्हाण , समर्थ चिंतलवाड , स्वरा तमशेट्टे , संचिता आडे , दिव्या मुळके, गोविंदराज कदम आदी विद्यार्थ्यांनी छान पात्रे वटवून टाळ्या मिळविल्या. चौथीच्या ईश्वरी काळे या मुलीने सुंदर नृत्य सादरीकरण करून जोरदार टाळ्या मिळविल्या. आरोही व दिविजा या मुलींनी समुह नृत्य सादर केले. तिसरीच्या दिव्या मुळके ' समर्थ मस्कले , सय्यद तहेमीन , पंकजा कराळे या विद्यार्थ्यांनी व्यसनाधिन तरुणाच्या संसाराचे खुप छान नाट्यमय अभिनय सादर केले. पाचवीच्या जान्हवी शिंदे व संचाने समूहनृत्य सादर केले. प्रांजल , रोहिणी या मुलींनी नृत्य सादर केले.रेवा गायकवाड या मुलीने 'बरसो रे मेघा बरसो ' या तर उज्वल गायकवाड या मुलाने पुष्पा २ मधल्या गाण्यावर चांगलीच शाबासकी मिळवली. जान्हवी शिंदे या मुलीने संदेशे आते है या गाण्यावर नृत्य करून टाळ्या मिळवल्या . वेदश्री जुन्ने , रिहान शेख यांनी गीत गायले . जाधव मॅडम व गीते मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली नर्सरी क्लासच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. अधून मधून नृत्य, नाटिका , गीत गायन आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरण अशा मिश्र स्वरूपाच्या कार्यक्रमामुळे चांगलीच रंगत वाढली. विविध स्पर्धेत विजेत्या स्पर्धकांनी बक्षिसांची अक्षरशः लयलूट केली. विविध स्पर्धेच्या माध्यमातून मिळालेल्या संधीचे विद्यार्थ्यांनी सोने केले. वंदेमातरम् गीत गाऊन कार्यक्रमाचा समारोप झाला. मुख्याध्यापक जगदीप जोगदंड यांच्या नेतृत्वात सुधाकर जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वी झाला. कार्यक्रमाचा आरंभ संगीतशिक्षक सचिन सुर्यवंशी सर व विनिता चव्हाण यांच्या स्वागतगीताने झाला.

# सादोळा ग्रामपंचायतीमध्ये एमआरजीएसची विवीध बोगस कामे

माजलगाव, प्रतिनिधी: तालुक्यातील सादोळा ग्रामपंचायती अंतर्गत रोजगा हमी योजनेअंतर्गत काम बोगस करण्यात येत असुन प्रचंड भ्रष्टाचार केला जात आहे. त्याचबरोबर काम न करता केवळ कागदपत्री काम चालु आहे. याची जिल्हापरिषदेच्या मुख्याधिका-यांनी चौकशी करावी अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय ज्ञानदेवराव सोळंके यांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडे केली आहे.




दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दलित वस्तीतील स्मशानभुमीतील रस्ता निकृष्ट दर्जा करून त्याचे बीले उचलले आहेत तर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या संरक्षण भिंतीचे काम बोगस पध्दतीने सुरू आहे. त्याचे अंदाजपत्रक हे कामापेक्षा जास्त केले असल्याने सदरील कामासाठी जुन्या बांधकामांचे रॉ मटेरियल वापरण्यात येत आहे. त्यामुळे सादोळा ग्रामपंचायती अंतर्गत होत असलेले कामे सरपंच, ग्रामसेवक, पंचायत समिती कर्मचारी दर्जाहिन करत असल्याची तक्रार देउनही दुर्लक्ष केले गेले. त्यामुळे या बोगस, दर्जाहिन कामास ग्रामसेवक, पंचायत समिती अधिकारी, कर्मचारी हे जबाबदार असुन त्यांची चौकशी होईपर्यंत या कामाची देयके अदा करू नयेत व चौकशीअंती दोषींवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणीही जिल्हा परिषदेच्या मुख्याधिका-यांनी चौकशी करावी अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय ज्ञानदेवराव सोळंके यांनी केली असुन निवेदनावर कृष्णा सोळंके, अशोक सोळंके, तंटामुक्ती अध्यक्ष विश्वांभर सोळंके, गौतम सोळंके यांच्या स्वाक्ष-या आहेत. .

# नगरमध्ये कुस्त्यांची दंगल!; कुस्तीगीरांचे अहिल्यानगरीत आगमन

## राज्यातून कुस्तीगीरांचे अहिल्यानगरीत आगमन । इन कॅमेरा पैलवानांचे वजन

**अहिल्यानगर । प्रशांत बाफना**
**जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष आ.संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली अहिल्यानगरमध्ये होणाऱ्या ६७ वी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेची तयारी पूर्ण झाली आहे. वाडियापार्क मैदानावर उभारण्यात आलेल्या कै.बलभीमआण्णा जगताप क्रीडानगरीमध्ये भव्य व आकर्षक व्यासपीठ, प्रवेशद्वार तसेच चार आखाड्यांसाठी रेसलिंग प्लॅटफॉर्म उभारण्यात आले आहे. प्रवेशद्वार व व्यासपीठास खास शिवकालीन स्वरूप देण्यात आले आहे.**

महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी संपूर्ण राज्यातून नामवंत पैलवानांचे आगमन नगर शहरात होण्यास आज सकाळ पासून सुरवात झाली आहे. त्यांचे वजना प्रमाणे इन कॅमेरा गट तयार करण्याच्या कामासही सुरवात झाली आहे. आज दुपारनंतर माती व गादी दोन्ही प्रकारात कुस्त्यांच्या थारारास सुअर्वात होणार आहे, अशी माहिती जिल्हा कुस्तीगीर संघाचे सचिव प्रा.डॉ.संतोष भुजबळ यांनी दिली.

महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी उभारण्यात आलेल्या क्रीडानगरीमध्ये १०० बाय ४५ फुटाचे किल्ल्याच्या बुरुजाच्या प्रतिकृतीचे भव्य व्यासपीठ उभारले आहे. त्यावर पुण्यलोक अहिल्यादेवी होळकर यांची पूर्णाकृती प्रतिमा तसेच जिजामाता व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमा लावण्यात आल्या आहेत. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, पालकमंत्री राधाकृष्ण विखे, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांचे पोट्रेट लावले आहेत.

मैदानात चहूबाजूला मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह स्पर्धेचे संयोजक आ.संग्राम जगताप, माजी खासदार सुजय विखे यांचे पोस्टर लावले आहेत. मुख्य व्यासपीठावर १०० प्रमुख पाहुण्यांची आसन व्यवस्था करण्यात आली आहे. मुख्य व्यासपीठा शेजारी दोन व्हीआयपी व्यासपीठ उभारण्यात आले असून त्या ठिकाणी प्रत्येकी ५० व्हीआयपींची आसन व्यवस्था करण्यात आली आहे. स्टेज समोरील रेसलिंग प्लॅटफॉर्मवर मातीचे व गादीचे चार आखाडे तयार करण्यात आले असून त्या भोवती आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष पै. अशोक शिर्के व पै. अर्जुन शेळके यांनी दिली.

महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या ठिकाणी सुरक्षिततेसाठी पूर्ण काळजी घेण्यात आली आहे. व्यासपीठ परिसरात पास धारक व्यक्तीलाच प्रवेश देण्यात येणार आहे. येथे तातडीची वैद्यकीय उपचार सुविधाही उपलब्ध करण्यात आली आहे. नागरिकांसाठी प्रेक्षक गॅलरीत आसन व्यवस्था करण्यात आली असून आखाड्यांमध्ये होणाऱ्या कुस्त्या व्यवस्थित पाहता याव्यात यासाठी जागोजागी एलईडी स्क्रीनची व्यवस्था करण्यता आली आहे, अशी माहिती कार्यालयीन सचिव निलेश मदने यांनी दिली.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई,च्या डिजिटल मीडिया च्या बिड जिल्हाध्यक्षपदी अनिल आगुंडे यांची निवड

बीड /प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई ची राज्यस्तरीय बैठकीचे आयोजन दि २८ जानेवारी मंगळवार रोजी मोरेश्वर सभागृह कोथरूड,पुणे येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, च्या डिजिटल मिडियाच्या बीड जिल्हा अध्यक्ष पदी अनिल आगुंडे यांची निवड करण्यात आली.ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशन चे राष्ट्रीय अध्यक्ष अशोकराव वानखेडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे संस्थापक संजयजी भोकरे साहेब, राजकिय विश्लेषक देसाई, सरचिटणीस विश्वासराव आरोटे, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे,

प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी, डिजिटल मिडिया प्रदेशाध्यक्ष सिध्दार्थ भोकरे,अक्षय पुजारी यांच्या प्रमुख उपस्थितीत हि निवड करण्यात आली. यावेळी राज्यातील पदाधिकारी मोठ्या संख्येत उपस्थित होते. अनिल आगुंडे हे गेल्या आठ नऊ वर्षापासून पत्रकार संघाचे गेवराई तालुका कार्याध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय जी भोकरे यांच्या आदेशावरून डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे यांच्या हस्ते अनिल आगुंडे यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. आतापर्यंत जसे मनोभावे या संघाचे कार्य मी केले त्यापेक्षाही अधिक चांगल्या पद्धतीने मी महाराष्ट्र पत्रकार संघासाठी




काम करेल व पत्रकार संघाचे संघटन करून जिल्हाभरामध्ये संघटनेचे जाळे निर्माण करेल असे मनोगत यावेळी अनिल आगुंडे यांनी व्यक्त केले. दरम्यान महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजयजी भोकरे, डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे,प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे, यांच्यासह महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विभागीय उपाध्यक्ष, सुनील पोपळे,गेवराई तालुका अध्यक्ष अंकुश आतकरे,साप्ताहिक लोकनाथ चे संपादक शेख अब्दुल रहमान, साप्ताहिक गेवराई संघर्ष योद्धा चे संपादक अमोल कापसे, गेवराई टाईम्स संपादक शेख सलमान,राम संभाहारे,राहुल गिरे, यांच्यासह अनेकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# विद्यार्थ्यांच्या बहारदार नृत्यांने प्रेक्षक,पालकांची मने जिकंली

जि.प.मुलींचे हायस्कूलमध्ये रंगला 'फुलोरा' सांस्कृतिक कार्यक्रम.

मुखेड / प्रतिनिधी

शैक्षणिक गुणवत्तेसह विविध क्षेत्रात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी अविरत अग्रेसर असणारी मुखेड शहरातील आदर्श शाळा जिल्हा परिषद हायस्कूल मुलींचे या प्रशालेत भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७६ व्या वर्धापण दिनाचे औचित्य साधून दि.२७ जानेवारी रोजी 'राज्यस्तरिय विज्ञान नाटीका' व 'फुलोरा' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. सदर सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या अंगीकृत असलेल्या विविध कलागुणांतून एकापेक्षा एक सरस व बहारदार नृत्यांचे सादरीकरण करुन प्रेक्षक,पालक व उपस्थितांची मने जिकंली.या नेत्रदिपक सांस्कृतिक कार्यक्रमाने मुखेडकर मंत्रमुग्ध झाले असुन कार्यक्रमास पालक व प्रेक्षकांचा उंदड प्रतिसाद मिळाला.विद्यार्थ्यांचे जबरदस्त नृत्य पाहुन प्रेक्षक भारावून चिमुकल्यांचे जोरदार टाळ्यांच्या गजरात कौतुक केले आहे.

राज्यस्तरिय विज्ञान नाटीका व फुलोरा या सांस्कृतिक कार्यक्रमाचे उदघाटन नायब तहसीलदार पांडुरंग गंगनर, पोलिस




निरीक्षक लक्ष्मण केंद्रे, गटशिक्षण अधिकारी कैलास होनधरणे,वैद्यकीय अधिक्षक डॉ.संतोष टाकसाळे यांच्या हस्ते करण्यात आले.सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेताब शेख होते.प्रमुख अतिथी म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी बाळासाहेब कदम, सावरगाव जि.प.हायस्कूलचे मुख्याध्यापक तथा राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक जि.सी. चव्हाण,जि.प.हा.मुलीचे शाळेचे मुख्याध्यापक डी.जे.कांबळे, केंद्रप्रमुख उत्तम चव्हाण,माजी केंद्रप्रमुख मधुकर गायकवाड, वैद्यकीय संस्थेचे अध्यक्ष डॉ. रामराव श्रिरामे,शा.व्य.समितीचे उपाध्यक्षा उर्मिला गित्ते, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख मलिकार्जुन एकाळे,उत्तमराव धनशेट्टी, शिवसनेचे शहरप्रमुख बजरंग कल्याणे,मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष बाळानंद गबाळे,पत्रकार संघाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर डोईजड,जेष्ठ पत्रकार यशवंतराव बोडके,सुशील पत्की, माजी अध्यक्ष संदीप पिल्लेवाड, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य सुनिल तरगुडे,नंदकुमार काचावार,संजय यल्लमवाड, संतोष मठपती,गौतम गवळे, अन्वर अत्तार,गंगाधर घायाळे, भवानिसिंह चौहाण सरदारबेगम पठाण,रुक्मिणबाई पंदीलवाड, श्रिदेवी पांचाळ,अर्चना वाघमारे, शिक्षक प्रतिनिधी आश्विनी कुलकर्णी यांच्यासह अनेक मान्यवर व शा.व्य.समितीचे पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदर कार्यक्रमाची सुरूवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करुन करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सांस्कृतिक विभागप्रमुख दिलीपराव देवकांबळे,दिपक लोहबंदे,सहशिक्षिका सौ.सुरेखा हराळे,सहशिक्षक कल्याण इंगळे,श्यामसुंदर दारकु यांनी केले तर प्रास्ताविक मुख्याध्यापक डी.जे.कांबळे यांनी केले.उपस्थितांचे आभार सहशिक्षक दिपक लोहबंदे यांनी मानले.यावेळी प्रशालेतील सर्व शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी,सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.या सांस्कृतिक कार्यक्रमास शहर व तालुक्यातील पालक, विद्यार्थी व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाबळ विभागातील नेवरेवाडी येथे दारू विक्रीचे थैमान दारू बंद करण्यासाठी विभागातील नागरिकांचे आंदोलन!




गडब/सुरेश म्हात्रे

पेण तालुक्यातील अतिशय दुर्गम भागातील पाबल विभागातील नेवरे वाडी येथे भास्कर भगत नावाच्या व्यक्तीने दारू विक्रीचा मोठा धंदा चालू केला असून परिसरातील ठाकूर समाजातील नागरिकांना गावठी दारू पोहोचवण्याचे उद्योग तो स्वतः करत आहे यामुळे या परिसरातील लोकांना गावठी दारू बनवण्याचे व सेवन करण्याचे उद्योग सुचले आहेत.

सदर इसमाचे मूलगाव पांडापूर असून तो नेवरे वाडी येथे स्थायिक झाला आहे त्यांनी या धंद्यातून मोठा पैसा उकळला आहे वडखल पोलीस ठाण्याचे बिट हवालदार ठाकूर हे परिसरातून माया जमविता आहेत. त्यामुळे या परिसरातील धंदेवाल्यांकडून सदर बिट हवालदार वसुली करत आहेत तरी जिल्हा पोलीस प्रमुख यांनी कायदेशीर कारवाईचे आदेश वडखल पोलिसांना द्यावेत अशी मागणी परिसरातील नागरिकांतून होत आहे.




**माजलगाव /प्रतिनिधी : विद्यार्थ्यांनी मनाशी स्वप्न बाळगले तरच त्यांच्या करियरला दिशा मिळू शकते. आजच्या पिढीने मोबाईलच्या आहारी जाणे थांबवले पाहिजे. विद्यार्थ्यांनो स्वत:स्थिती बदलली तरच आयुष्य घडते असे प्रतिपादन व्याख्याते बाळासाहेब सोनसळे यांनी केले. सिद्धेश्वर महाविद्यालयात बारावीच्या शुभेच्छा समारंभात बोलत होते. स्थानिक अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, केंद्रीय सदस्य प्रकाश दुगड, महाविद्यालय समितीचे प्रमुख अभय कोकड, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, उपप्राचार्य प्रा. अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री यांची उपस्थिती होती.**